नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## रेपो दर जैसे थे, कर्ज महाग होणार नाही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
यावेळी रेपो दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तो 5.25% वर कायम ठेवण्यात आला आहे. म्हणजेच, कर्ज महाग होणार नाही आणि तुमचा एटकदेखील वाढणार नाही.

आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज 6 फेब्रुवारी रोजी मॉनिटरी पॉलिसी कमिटीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणजेच, आरबीआयने डिसेंबरमध्ये व्याजदर 0.25% ने कमी करून 5.25% केले होते. आरबीआय ज्या दराने बँकांना कर्ज देते, त्याला रेपो दर म्हणतात. जेव्हा आरबीआय रेपो दर कमी करते, तेव्हा बँकांना स्वस्त कर्ज मिळते आणि ते हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवतात.

* वर्ष ५२ * अंक २१५ * * अकोला * शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## शेतीला दुर्लक्षू नका!




आपल्या महाराष्ट्रात शेतीच्या बाबतीत काय काय गंमती-जमती सुरू आहेत. त्याची चौकशी केल्यावर जे दिसून येते ते निश्चितच मनाला प्रचंड वेदना देणारे आहे. आपला भारत देश कृषीप्रधान आहे असे म्हणतात. त्यातल्या त्यात महाराष्ट्र तर त्याबाबतीत आणखीनच आघाडीवर आहे. आपण देशातील क्रमांक एकचे साखर उत्पादक आहोत. या गोष्टींमधले राजकारण थोडा वेळ बाजूला ठेवले तर शेतीला कायमच डावलले जात आहे, हे निदर्शनास आले आहे. आजपर्यंतचा आपल्या कृषी खात्याचा कारभार बघितला तर शेतीसाठी जो काही निधी मिळतो तो नको त्या कामासाठी जास्त वापरला जातो. आपण कृषीप्रधान असलो तरी जगाच्या तुलनेत आपण उत्पादनाच्या बाबतीत खूपच मागे आहोत. आपण हरितक्रांती केली, आपले उत्पादन वाढले. पण शेतक ?यांचे उत्पन्न वाढले काय, याचे उत्तर मात्र नकारात्मक आहे. किमान या कृषीप्रधान देशाच्या या राज्यात शालेय शिक्षणात तरी कृषीला स्थान आहे काय, याचेही उत्तर नाही असेच आहे. आपल्या राज्यात चार कृषी विद्यापीठे आहेत. त्यातही शेतकऱ्यांच्या समस्या जाणून त्यासाठी उपाय योजना करण्यापेक्षा पुस्तकी ज्ञान देण्याचे कार्य होत असते. शालेय शिक्षणात शेतीचा समावेश करण्याचा धोरणात्मक निर्णय सरकारने बऱ्याच वर्षांपूर्वी घेतला होता. त्या निर्णयाला आज दोन दशके लोटलेली आहेत. असे अभ्यासक्रम शालेय शिक्षणात यावेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना तरी निदान शेतीची प्राथमिक ते शास्त्रीय अशा स्वरूपात माहिती व्हावी अशी यामागची संकल्पना होती. परंतु सरकारी लालफितशाही अशी काही आडकाठी करीत आहे की समित्यांमागे समित्या नेमून केवळ वेळकाढूपणाच होत आहे. जरी कुणी कधी अनुकूल अहवाल दिला तरी तो धूळ खात पडतो. त्यातच महत्वाचे म्हणजे आपली कृषी विद्यापीठेच त्याचा विरोध करतात. खरे पाहिले तर इतर सर्व गोष्टींपेक्षा या बाबीला अधिक महत्त्व देणे गरजेचे होते. म्हणजेच मॅट्रिक पर्यंत शेतीमध्ये थोडेही शिक्षण न घेता विद्यार्थ्याला कृषी विद्यापीठाकडे पाठवणे कितपत योग्य आहे. त्यामुळेच महत्त्वाची बाब अशी आहे की वयाच्या सोळा सतरा वर्षापर्यंत शेतीबाबत जराही ज्ञान नसताना तो भावी काळात उच्च शिक्षण योग्य प्रकारे घेऊ शकेल काय, या प्रश्नाचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. कारण एखाद्याला डॉक्टर व्हायचे असेल तर त्याला मॅट्रिकच्या आधीच जीवशास्त्रासह संपूर्ण विज्ञान हा विषय घ्यावा लागतो. तसे कृषी शिक्षणासाठी का होत नाही, याबाबतीत कुठे अडचण आहे. याचा संपूर्ण विचार करून आता तरी सरकारने या शिक्षणाचा पाठपुरावा करावा आणि हा प्रश्न मार्गी लावावा, एवढीच आमची अपेक्षा आहे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# गडचिरोलीला बनवणार देशातील ग्रीन स्टील हब

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : ॲडव्हांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाचे उद्घाटन : पहिल्याच दिवशी ४ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
विदर्भातील नक्षल प्रभावित गडचिरोली जिल्ह्याची ओळख ग्रीन स्टील हब ऑफ इंडिया अशी तयार करणार असून, गडचिरोलीमध्ये स्टील विषयक इकोसिस्टीम तयार करून चीनपेक्षा कमी दराचे स्टील संपूर्ण जगाला उपलब्ध करून देऊ असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसर, अंबाझरी, अमरावती मार्ग, नागपूर येथे आयोजित असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंटच्यावतीने आयोजित एडवांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात ते उपस्थित लोकांना संबोधित करत होते.

राज्यात वेगवेगळे मॅग्नेट (हब) तयार करून त्या शेजारचे जिल्हे विकसित करण्याचा उद्देश आहे, असे सांगत नागपूरमध्ये महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने केलेल्या इंटिग्रेटेड ऑटोमोबाईल फॅसिलिटीबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले. ही सुविधा २०२८ मध्ये काम सुरू करण्याची शक्यता असून पंधरा हजार कोटींची गुंतवणूक या माध्यमाने होणार आहे. याशिवाय सोलर मॉडयूल मध्ये देशातली सर्वात मोठी इकोसिस्टीम नागपुरात तयार होत असून एक लाख रोजगार निर्मिती या माध्यमाने होणार आहे.

अमरावती इथल्या यशस्वी इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्कच्या धरतीवर दुसरा पार्क पीएम मित्रा योजनेअंतर्गत तयार होणार असून अमरावती एअरपोर्ट नजीक एव्हिएशन स्कूल तयार होत आहे. यामुळे यवतमाळ, बुलढाणा, वाशीम आणि अकोला जिल्ह्याला मोठ्या प्रमाणावर लाभ होणार आहे. भविष्यातील जीसीसी लाट लक्षात घेता औद्योगिक धोरण महत्त्वाचे असल्याचा ते म्हणाले. याशिवाय नळगंगा प्रकल्प, जल नियोजन, फूड प्रोसेसिंग, गॅस बेस्ड इंडस्ट्री या सर्वांवर त्यांनी सविस्तर चर्चा केली.

राज्याचे उद्योग सचिव पी अन्बलगन यांनी राज्यात होऊ घातलेल्या तीन औद्योगिक क्लस्टर बद्दल माहिती देत २०४७ पर्यंत विदर्भ मोठ्या प्रमाणात देशाच्या विकासात योगदान देईल असे सांगितले.

तत्पूर्वी असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी प्रास्ताविकातून मागील दोन खासदार औद्योगिक महोत्सव यांचा आढावा घेत यादरम्यान मिळवलेल्या उपलब्धि उपस्थित सर्वांना सांगितल्या. एआयडीच्या माध्यमातून जीसीसी आणि बांबू विषयक प्रस्ताव मंजूर करून ते सरकारने औद्योगिक धोरणात सामील केले.

याशिवाय शंभर एकर वर ग्लोबल स्किल युनिव्हर्सिटीचे कार्य प्रगतीपथावर असून मनपा, एआयडी आणि टाटा स्ट्राइड हे देखील एकत्रितपणे विविध उपक्रम राबवत असल्याची माहिती त्यांनी दिली. याशिवाय यंदा एडवांटेज विदर्भाचे स्वरूप अधिक व्यापक असल्याचे सांगून ३७० स्टॉल तीन दिवस बिजनेस आणि भव्य एक्सपो याशिवाय संध्याकाळच्या वेळी मनोरंजनात्मक कार्यक्रम यांचा अंतर्भाव असल्याची माहिती त्यांनी दिली.

अदानी समूहाचे संचालक जित अदानी यांनी केंद्रीय अर्थसंकल्पातील दूरदृष्टीपूर्ण आणि सकारात्मक धोरणांमुळे भारत २०४७ पर्यंत सातत्याने आर्थिक प्रगती साधत जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था होऊ शकतो, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुंधरा काशीकर यांनी केले. आभार प्रदर्शन कार्यकारी सदस्य निर्भय संचेती यांनी केले.

▶▶ पान २ वर



विदर्भात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊन उद्योग येऊ घातले असताना या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उद्योगांना लागणाऱ्या कौशल्य युक्त मनुष्यबळाची आवश्यकता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बोलून दाखवली. विदर्भ क्षेत्राच्या एकंदर विकासासाठी आणि गरिबी निर्मूलनासाठी उद्योगधंद्यांच्या वाढीच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. विदर्भाच्या विशिष्ट जिल्ह्यांची बलस्थाने ओळखण्यावर त्यांनी भर दिला. जसे कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये कॉटन बेस्ट इंडस्ट्री तयार करता येईल असं त्यांनी सुचवले. याच प्रमाणे सर्व जिल्ह्यांची बलस्थाने ओळखली तर निर्यातआधारित उद्योग तयार होतील असे ते म्हणाले. गडचिरोलीच्या सर्वोत्तम दर्जाच्या आयरन ओरचा उल्लेख करत त्यांनी गडचिरोलीमध्ये जगाचे स्टील हब होण्याचे सामर्थ्य असल्याचा उल्लेख केला. याशिवाय त्यांनी असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट तर्फे राज्य सरकारला पर्यटन विषयक शिफारसांचे औद्योगिक धोरणात यशस्वी समावेशन झाल्याबद्दल कौतुक केले.

पहिल्याच दिवशी चार महत्त्वपूर्ण सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यातला पहिला करार सुपरस्मेलटर्स लिमिटेड यांचा असून ते पोलाद उद्योगात दहा हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. याचा लाभ गडचिरोलीसह, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांना देखील होईल. महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आगामी दहा वर्षात १५ हजार कोटींची गुंतवणूक करणार असून नागपूर मध्ये ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक आणि ट्रॅक्टर यासाठी इंटिग्रेटेड हब तयार करणार आहे. याचा विस्तार नाशिक आणि संभाजीनगर येथे देखील होणार असून यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकेल. याशिवाय एन-मोटिव इंडिया आणि जीआयबीसी आणि एआयडी दरम्यान करार करण्यात आले.

## अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण बंद व्हावे

### फडणवीसांनी खडसावले



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. या संदर्भात होत असणारा वाद हा अतिशय निरर्थक आणि चुकीचा आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःच राजकारण यात कसं पाहता येईल, हा प्रयत्न करत असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

हे अतिशय चुकीचे आहे. शेवटी राज्याचे उपमुख्यमंत्री, राज्याचे अतिशय प्रसिद्ध व्यक्तिमत्व असणारे एक मोठे नेते, अजित दादा पवार हे दुर्दैवाने आपल्यातून निघून गेले आहेत. त्यानंतर प्रत्येक व्यक्ती त्याच्या माध्यमातून राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. हे अतिशय चुकीचे आहे. अशा प्रकारचे खालचे राजकारण बंद झालं पाहिजे, असे ठाम मत देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय वादांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या दुर्दैवी घटनेतून काहीजण राजकारण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जनतेत लोकप्रिय असलेले नेते अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे ▶▶ पान २ वर

## ३ नक्षली ठार : १ जवान शहीद

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ६ :
छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवर पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात महाराष्ट्राच्या सी-६० कमांडोजनी ३ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. चकमकीत एक जवान शहीद झाला, तर एक जवान जखमी झाला आहे.

जखमी जवानाला एअरलिफ्ट करून रुग्णालयात आणण्यात आले आहे. घटनास्थळावरून एक एके-४७ आणि एक एसएलआर रायफल जप्त करण्यात आली आहे. ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख पटवली जात आहे. या चकमकीची पुष्टी महाराष्ट्र पोलिसांनी केली आहे. हे संपूर्ण प्रकरण महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुका क्षेत्रातील आहे.



शहीद दीपक मडावी

### १ वर्षात २३२ नक्षलवादी ठार

बीजापूर एसपी डॉ. जितेंद्र कुमार यादव यांच्या माहितीनुसार, गतवर्षी जिल्ह्यात झालेल्या वेगवेगळ्या चकमकींमध्ये १६३ माओवादी ठार झाले, तर २०२६ मध्ये आतापर्यंत ११ माओवादी ठार झाले आहेत.
जानेवारी २०२४ पासून आतापर्यंत जिल्ह्यात २३२ नक्षलवादी ठार झाले, ११६३ जणांना अटक करण्यात आली.

६ फेब्रुवारीच्या सकाळी अबूझमाडच्या जंगलात सर्चिंगसाठी गेलेल्या सुरक्षा दलाची नक्षलवाद्यांशी चकमक झाली. यावेळी सी-६० चे जवान, कॉन्स्टेबल दीपक चिन्ना मडावी (३८ वर्षे) गंभीर जखमी झाले होते. हेलिकॉप्टरने भामरागड उप-जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

एक दिवसापूर्वी ५ फेब्रुवारी रोजी छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी नक्षलवादी कमांडर उधम सिंहचा खात्मा केला होता. उधम सिंह २०२१ मध्ये झालेल्या टेकुलगुडेम चकमकीत सामील होता. जिथे नक्षलवादी हल्ल्यात २२ जवान शहीद झाले होते. उधम सिंग प्लाटून क्रमांक ३० चा कमांडर होता आणि तो जगरगुंडा एरिया कमिटीचा कमांडर होता. त्याच्यावर ८ लाखांचे बक्षीस होते.

## घोषणाबाजीनंतर लोकसभा सोमवारपर्यंत तहकूब

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :
शुक्रवारी संसदेत २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा होणार आहे. लोकसभेची सुरुवात प्रश्नोत्तराच्या तासाने झाली, परंतु विरोधकांनी गोंधळ घातला आणि घोषणाबाजी केली. तीन मिनिटांनंतर, सभापतींनी सभागृह दुपारी १२:०० वाजेपर्यंत तहकूब केले.

लोकसभेचे कामकाज दुपारी १२:०० वाजता सुरू झाले, परंतु विरोधकांनी सात मिनिटे ओरड आणि घोषणाबाजी सुरू ठेवली. त्यानंतर, लोकसभा ९ फेब्रुवारीपर्यंत तहकूब करण्यात आली. राज्यसभेचे कामकाज सुरू आहे.

केंद्रीय मंत्री रवनीत बिट्टू यांनी राहुल गांधींवर टीका करताना म्हटले की, काल सर्वांनी त्यांना मूल म्हटले. आज पंतप्रधानांची शाळा होती, जिथे मुलांना यशस्वी होण्याचे सांगितले जात होते. जर राहुल पंतप्रधानांच्या शाळेत गेले तर ते आयुष्यात यशस्वी झाले असते.

गुरुवारी, लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही ठिकाणी गदारोळात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव मंजूर करण्यात आला. २००४ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांच्या भाषणाशिवाय लोकसभेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणानंतर राज्यसभेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. दरम्यान, आज शुक्रवारीही विरोधकांचा गोंधळ सुरू असल्याने लोकसभा सोमवारपर्यत तहकुब करण्यात आली.

## भाजपच्या नीता ठाकरे नागपूरच्या ५५ व्या महापौर



उपमहापौरपदी भाजपच्या लीला हाथीबेड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
नागपूर शहराच्या ५५ व्या महापौरपदी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका श्रीमती नीता राजेंद्र ठाकरे यांची आज बहुमताने निवड झाली. याचवेळी उपमहापौरपदी भाजपच्याच नगरसेविका श्रीमती लीला हाथीबेड यांची बहुमताने निवड झाली.

नागपूर शहरासमोर असलेल्या समस्यांवर मात करून शहराचा सर्वांगिण विकासाला प्राधान्य राहील, असे नवनिर्वाचित महापौर श्रीमती नीता ठाकरे यांनी निवडीनंतर मनोगत व्यक्त केले. शहराच्या नागरी सुविधा विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, उपमहापौर श्रीमती लीला हाथीबेड यांनी सांगितले. महापौर श्रीमती नीता ठाकरे यांनी सभागृहाचे सत्तारुढ पक्षनेते म्हणून भाजपचे नगरसेवक श्री. नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर यांची घोषणा केली. त्याचप्रमाणे सभागृहाचे विरोधी पक्षनेते म्हणून काँग्रेसचे नगरसेवक संजय महाकाळकर यांच्या नावाची घोषणा केली.

## पंजाबमध्ये आप नेत्याची गोळ्या झाडून हत्या



■ वृत्तसंस्था, जालंधर, दि. ६ :
पंजाबमधील जालंधर येथे आम आदमी पक्षाचे नेते लक्की ओबेरॉय यांची ६ फेब्रुवारीच्या सकाळी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. ते ५२ वर्षांचे होते. स्कूटरवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्यांना ६ गोळ्या झाडल्या. त्यापैकी ५ छातीत आणि एक डोक्यात लागली.

लक्की ओबेरॉय मॉडेल टाऊन परिसरात गुरुद्वारात दर्शनासाठी आले होते. ते गुरुद्वारामधून बाहेर पडून आपल्या थार गाडीत बसू लागले, तेव्हा हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. रुग्णालयात डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## राज्यातील ८ शहरांना मिळाले नवे महापौर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
राज्यातील ८ महापालिकांमध्ये आज महापौर व उपमहापौरपदाची निवडणूक पार पडली. यात नागपूर व छत्रपती संभाजीनगरसह ६ शहरांत सत्ताधारी भाजप, तर एका महापालिकेत सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर खुर्चीत बसला आहे.




राज्यातील जळगाव, धुळे, कोल्हापूर, पिंपरी - चिंचवड, नागपूर, अमरावती, सोलापूर व नाशिक या ८ बड्या महापालिकांत आज महापौर निवडीची प्रक्रिया पार पडली. यात सोलापूर, जळगाव व अहिल्यानगर येथील चुरशीच्या वाटणाऱ्या निवडणुका ऐनवेळी बिनविरोध झाल्या. तर नागपूर व धुळ्यात भाजपने मोठ्या मताधिक्क्याने विजय मिळवला.

सोलापूर महापालिकेच्या महापौरपदी भाजपच्या विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड झाली. येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना व एमआयएमच्या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे कोंड्याल यांचा मार्ग मोकळा झाला.

जळगाव महापालिकेत भाजपच्या दीपमाला काळे यांची महापौरपदी वर्णी लागली. तर शिवसेनेच्या शिंदे गटाचे मनोज चौधरी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली. दीपमाला काळे या जळगाव महापालिकेच्या १७ व्या महापौर ठरल्या आहेत.

नागपूर महापालिकेत भाजपच्या नीता ठाकरे यांनी तब्बल १०४ मते मिळवत काँग्रेसच्या स्नेहल ठाकरे यांचा पराभव केला आहे. या ठिकाणी झालेल्या निवडणुकीत स्नेहल ठाकरे यांना ३६ मते पडली. ११ मतदारांनी येथे तटस्थ भूमिका बजावली. परिणामी, नीता ठाकरे यांचा मोठ्या मतफरकाने विजय झाला आहे. उपमहापौरपदी भाजपच्याच लीला हाथीबेड यांची नियुक्ती झाली.

धुळे महापालिकेत सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांत दुरंगी लढत दिसून आली. येथे भाजपच्या मायादेवी परदेशी यांनी ५० मते मिळवत महापौरपदी विजय मिळवला. तर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या संयुक्त उमेदवाराला अवघ्या १३ मतांवर समाधान मानावे लागले. नांदेड महापालिकेत पहिल्यांदाच भाजपचा महापौर विराजमान झाला आहे. भाजपने महापौरपदासाठी कविता मुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. येथे उपमहापौरपदासाठी दीपकसिंह रावत यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे.

## १२ जिल्हा परिषदांसाठी आज होणार मतदान

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
राज्यातील ग्रामीण राजकारणाची दिशा ठरवणाऱ्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली आहे. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होणार असून, प्रशासन आणि पोलीस यंत्रणा यासाठी पूर्णपणे सज्ज झाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे जाहीर झालेल्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने ५ फेब्रुवारीला होणारे मतदान पुढे ढकलून ते उद्या घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार आता रायगड, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धाराशिव, लातूर, परभणी आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये उद्या लोकशाहीचा उत्सव पार पडणार आहे.

या निवडणुकीत जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समितीच्या १,४६२ जागांसाठी जोरदार चुरस पाहायला मिळत असून, एकूण ७,४३८ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत.



## मुंबई महापौर निवडणुकीआधी मोठी राजकीय घडामोड

# राष्ट्रवादी शप गटाचा महायुतीला पाठिंबा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ :**
मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम अखेर जाहीर झाला आहे. ७ फेब्रुवारी रोजी महापौरपदासाठी अर्ज स्वीकारले जाणार असून, ११ फेब्रुवारीला नव्या महापौराची अधिकृत घोषणा होणार आहे.

मात्र, या निवडणुकीपूर्वीच एक महत्त्वाची राजकीय घडामोड घडली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत मनसे आणि ठाकरे गटाच्या शिवसेनेसह निवडणूक लढवलेल्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने महायुतीला पाठिंबा दिला आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे एकमेव नगरसेवक अजित रावराणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे महापौर निवडणुकीच्या गणितात




महायुतीची ताकद आणखी वाढली आहे.

देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महानगर पालिकेत तब्बल २५ वर्षांनंतर ठाकरे गटाची सत्ता उलथवून भाजप-नेतृत्वाखालील युती सत्तेत आली आहे.

या निवडणुकीत भाजपने ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान पटकावला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला ६५ जागा मिळाल्या असून, शिंदे गटाच्या शिवसेनेने २९ जागा जिंकल्या आहेत. काँग्रेसला २४, मनसेला ६, एमआयएमला ८, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला ३, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ला १ तर समाजवादी पक्षाला २ जागा मिळाल्या आहेत.

**नगरसेवकांना मुंबई न सोडण्याचे आदेश**

महापौर आणि उपमहापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला आहे. ११ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानाआधी सर्वच पक्षांनी आपल्या नगरसेवकांना मुंबईतच थांबण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. कोणत्याही परिस्थितीत मतदानाआधी शहर सोडू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, ९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या आंगणेवाडी जत्रेमुळे कोकण पट्ट्यातील काही नगरसेवक बाहेरगावी जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ही बाब लक्षात घेता सर्वच पक्षांकडून अतिरिक्त खबरदारी घेतली जात आहे. स्पष्ट बहुमत नसतानाही शिवसेना (ठाकरे गट) ने आपल्या नगरसेवकांना १५ फेब्रुवारीपर्यंत मुंबई सोडू नका, असे आदेश दिले आहेत.

भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांनीही आपल्या नगरसेवकांना सूचना दिल्या आहेत. ८ फेब्रुवारी रोजी रविवार असल्याने काही नगरसेवक बाहेर जाण्याची शक्यता असली तरी, १० फेब्रुवारीपर्यंत अनिवार्यपणे मुंबईत उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महापौर निवडणूक तोंडावर असताना संख्याबळ टिकवण्यासाठी सर्वच पक्ष सतर्क झाले असून, येत्या काही दिवसांत मुंबईतील राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता आहे. पुढील दोन ते तीन दिवसात महायुती आणि आघाडीत मोठ्या घडामोडीची शक्यता आहे.

## मोदींनी कोणती क्रांती केली की त्यांच्यावर हल्ला होईल?



■ **मुंबई :** खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा ठाम दावा केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अशी कोणती क्रांती केली की, लोक त्यांच्यावर हल्ला करतील. ते अत्यंत नॉर्मल जीवन जगत आहेत. मजा करत आहेत. परदेशात जात आहेत, असे ते म्हणालेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोधकांनी संसदेत बोलू दिले नसल्याचा आरोप होत आहे. विशेषतः लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मोदींसोबत संसदेत काही अघटित होण्याची शक्यता असल्यामुळे आपण त्यांना सभागृहात न येण्याची विनंती केल्याचे सांगितले होते. त्यांच्या या विधानावर देशाच्या राजकारणात वेगवेगळ्या चर्चा झडत असताना संजय राऊत यांनी मोदींची सुरक्षा उच्च कोटीची असल्याचा दावा करत त्यांच्यावर हल्ला होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा ठाम दावा केला आहे.

संजय राऊत शुक्रवारी दुपारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, या जगात सर्वात सुरक्षित कुणी असेल तर ते या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. त्यांची सुरक्षा व्यवस्था इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू व अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याहून जबरदस्त आहे. त्यानंतरही त्यांना का असुरक्षित वाटत आहे हे मला माहिती नाही. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशासाठी खलिस्तान्यांशी पंगा घेतला होता. जनरल वैद्य यांची हत्या झाली. राजीव गांधी यांना मारण्यात आले. राजीव गांधींनीही देश व सुरक्षेसाठी श्रीलंकेला मदत केली होती.

मोदींनी काय केले? ते आमचे पंतप्रधान आहेत. त्यांना काहीही होणार नाही. मोदींनी असे काय केले आहे की, लोक त्यांच्यावर हल्ला करतील. त्यांनी अशी कोणती क्रांतीकारी गोष्ट केली आहे? हे सांगा. त्यांनी काहीही केले नाही. जो व्यक्ती आपल्या पदाचा आनंद घेत आहे, त्याच्यावर कोण कशाला हल्ला करेल? असे संजय राऊत म्हणाले.

## वाढदिवसाचा सोहळा साजरा करू नका

### उपमुख्यमंत्री शिंदेंचे आवाहन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे यंदा ९ फेब्रुवारी रोजी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. पुष्पगुच्छ, भेटी आणू नयेत, शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज लावू नये, तसेच वाढदिवसानिमित्ताने कोणताही सोहळा आयोजित करू नये, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे.



अजित दादांच्या अकाली जाण्याच्या वेदनेतून महाराष्ट्र आजही सावरलेला नाही. व्यक्तिशः मी माझा सहकारी आणि मित्र गमावला आहे. दादांच्या निधनाने झालेली अपरिमित हानी भरून येणारी नाही. पवार कुटुंबाच्या दुःखात आपण सहभागी आहोत.

अशा या दुःखद परिस्थितीत वाढदिवस साजरा करणे, सोहळे-समारंभ करणे मला उचित वाटत नाही. त्यामुळेच परिस्थितीचे गांभीर्य आपण जपूया, माझ्या वाढदिवसानिमित्ताने कुणीही पुष्पगुच्छ आणू नयेत, होर्डिंग्स लावू नयेत, तसेच कोणताही समारंभ, कार्यक्रम आयोजित करू नयेत, अशी विनंती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली आहे.

## सुनेत्रा पवारांचा शपथविधी लवकर का उरकला?

■ **मुंबई :** अजित पवारांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पत्नी तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा शपथविधी अत्यंत घाईगडबडीत उरकण्यात आला. याविषयी सत्ताधारी शिवसेनेच्या २ बड्या मंत्र्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शपथविधी लवकर कुणी करायला लावला? दुःखद घटनेनंतर लवकर शपथविधी लोकांना फारसे आवडले नाही, असे या मंत्र्यांनी म्हटले आहे. मंत्री उदय सामंत व मंत्री संजय शिरसाट यांनी वरील विधान केले आहे.

उदय सामंत म्हणाले की, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री झाल्यामुळे कुणाला वाईट वाटेल असे अजिबात नाही. पण हे इतक्या लवकर का झाले? कुणी करायला लावले? मग हे कुणी घडवून आणले आहे का?

दुसरीकडे, मंत्री संजय शिरसाट यांनीही सुनेत्रा पवारांचा घाईगडबडीत उरकलेला शपथविधी लोकांना आवडला नसल्याचा दावा केला आहे. ते आज पत्रकारांशी बोलताना म्हणाले, अजित पवारांच्या दुःखद घटनेनंतर लवकर शपथविधी होणे हे सर्वसामान्य माणसांना आवडले नाही. म्हणून मी त्यावेळी माझी भावना व्यक्त केली. ही लोकभावना आहे. मी ती मांडली. या प्रकरणी कुणाचा गैरसमज होत असेल तर त्याविषयी मला काही देणेघेणे नाही, असेही शिरसाठ म्हणाले.

## दादांच्या विमानात बॉम्ब होता का?

■ **वृत्तसंस्था**
**बीड, दि. ६ :**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताविषयी संशय व्यक्त केला आहे. अजित पवारांच्या अपघाता विषयी वेगवेगळे निष्कर्ष काढले जात आहेत. त्या विमानात बॉम्ब होता का? असेही म्हटले जात आहे. त्यामुळे या प्रकरणी अजित पवार घराबाहेर पडण्यापासून विमानात बसेपर्यंतचे सीसीटीव्ही फुटेज जाहीर केले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.



### शरद पवारांच्या खासदाराचा सवाल

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून या घटनेविषयी वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यात आता बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांची भर पडली आहे.

बजरंग सोनवणे या प्रकरणी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, अजित पवारांच्या अपघाताविषयी वेगवेगळे निष्कर्ष काढले जात आहेत. या घटनेचा सखोल तपास झाला पाहिजे. अजित पवार घराबाहेर पडल्यापासून विमानात बसेपर्यंतचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले पाहिजे.

विमानात ६ लोक होते, मग ५ मृतदेहच का सापडले? ज्या प्रकारे अपघात झाला ते पाहता, त्या विमानात बॉम्ब होता का? हे पाहिले पाहिजे. अंजली दमानिया यांच्या प्रश्नांची चौकशी झाली पाहिजे. विमानाचा पायलट कोण होता? याचीही चौकशी झाली पाहिजे. घटनेच्या दिवशीचे सकाळ पासूनचे सीसीटीव्ही फुटेज दाखवले गेले पाहिजे. विमान वरच क्रॅश झाले. विमान वर हवेतच ब्लास्ट का झाले? असे वेगवेगळे प्रश्न सोनवणे यांनी उपस्थित केले.

**दादा माझे राजकीय वडील**

बजरंग सोनवणे यांनी यावेळी आपल्या घडवण्यात अजित पवारांचा खूप मोठा वाट असल्याचेही स्पष्ट केले. ते म्हणाले, माझ्या जडणघडणीत अजित पवारांचा खूप मोठा वाटा आहे. मी १९९९ मध्ये त्यांच्या संपर्कात आलो. ते माझे राजकीय वडील होते. आज संपूर्ण महाराष्ट्र दुःखात आहे. संपूर्ण देश दुःखात आहे. हा सर्व नियतीचा खेळ आहे.

येडेश्वरी कारखाना परिसरात अजित पवार यांचे भव्य स्मारक उभारले जाईल. या स्मारकातून सर्वांना ऊर्जा मिळेल. हे स्मारक पुढील वर्षभरात बांधून तयार होऊन अजित पवारांच्या पहिल्या पुण्यतिथीला त्याचे लोकार्पण होईल, असे खा. सोनवणे यांनी यावेळी स्पष्ट केले.

## तटकरेंनी गलिच्छ राजकारण सुरू केले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
अजितदादा गेल्यावर शरद पवारांना शह देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गलिच्छ राजकारण सुरू केले. दादांची स्मशानातील राख विजली नव्हती तोच सुनेत्रा पवार यांना शपथ घ्यायला लावली असे म्हणत शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी तटकरेंवर टीका केली आहे. तटकरे यांनी जे राजकारण केले ते महाराष्ट्रासाठी लाजीरवाणे आहे.



रामदास कदम म्हणाले की, सुनेत्रा पवार यांचा शपथविधी १० दिवसांनंतर घेतली असती तर काय झाले असते? हा माणूस इतका चाणाक्ष आहे त्यांना वाटले की शरद पवार पक्षाचा ताबा घेतील म्हणून त्यांनी शपथविधी करायला लावला, असा दावा कदम यांनी केला आहे.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अजित पवारांचा अपघाताबद्दल शंका व्यक्त करत असताना प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि पार्थ पवार यांनीच काही तर केले नाही ना अशी शंका व्यक्त केली होती यावर बोलताना रामदास कदम म्हणाले की, सुनील तटकरे काहीही करू शकतात, ज्या तटकरेंना तिकीट मी मिळवून दिले त्यांच्या तिकीटासाठी मी भांडलो मी त्यांना निवडून आणले त्यांनी लगेच विधानसभेला माज्या मुलाला संपवण्याचा प्रयत्न केला ते सुनील तटकरे काहीही करु शकतात. तटकरे हे भास्कर जाधव यांचा भाऊ आहे असा टोलाही त्यांनी जाधवांना लगावला आहे.

## विधानसभेच्या गणितात मविआ अडकली

### राज्यसभेच्या चारपैकी तीन जागा गमवाव्या लागणार का?

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ६ :**
राज्याच्या विधानसभेतील बदललेल्या राजकीय समीकरणांचा जोरदार फटका आता महाविकास आघाडीला बसण्याची चिन्हे असून, आगामी राज्यसभा निवडणुकीत आघाडीचे दिल्लीतील संख्याबळ निम्म्याहून कमी होणार का, अशी चर्चा रंगली आहे.

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राजयातून राज्यसभेच्या सात जागा रिक्त होत आहेत, ज्यामध्ये सध्या महाविकास आघाडीच्या ताब्यात चार जागा आहेत. मात्र, विधानसभेतील अपु ?्या संख्याबळामुळे आघाडीला आपल्या हक्काच्या तीन जागांवर पाणी सोडावे लागणार असून केवळ एकाच जागेवर समाधान मानावे लागणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

?एका उमेदवाराला राज्यसभेवर निवडून आणण्यासाठी विधानसभेतील ३७ आमदारांच्या मतांची आवश्यकता असते. सध्याच्या आकडेवारीनुसार, महाविकास आघाडीकडे काँग्रेसचे १६, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे १० आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे २० असे मिळून एकूण ४६ आमदार आहेत.

या ४६ मतांच्या बळावर आघाडीचा केवळ एकच उमेदवार सुरक्षितपणे निवडून येऊ शकतो. दुसरीकडे, महायुतीकडे असलेल्या प्रचंड बहुमतामुळे उर्वरित सहा जागांवर त्यांचे उमेदवार विजयी होण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार, काँग्रेसच्या रजनी पाटील, ठाकरे गटाच्या प्रियांका चतुर्वेदी आणि राष्ट्रवादीच्या फौजिया खान निवृत्त होत आहेत.

२०२० मध्ये एकत्र लढून चार जागा जिंकणाऱ्या आघाडीला यंदा मात्र मोठी किंमत मोजावी लागणार आहे.

या सर्व घडामोडींत आता महाविकास आघाडीकडे उरलेल्या एकमेव जागेसाठी कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. खुद्द शरद पवार निवृत्त होत असल्याने आणि ते आघाडीचे प्रमुख नेते असल्याने, ही सुरक्षित जागा त्यांच्यासाठीच राखून ठेवली जाण्याची दाट शक्यता आहे.

मात्र, पवार पुन्हा निवडणूक लढवणार की नाही, याचा अंतिम निर्णय ते स्वतः घेतील. त्यामुळे जर पवार राज्यसभेवर गेले, तर प्रियांका चतुर्वेदी, रजनी पाटील आणि फौजिया खान यांची खासदारकी संपुष्टात येणार का आणि आघाडीचा आवाज क्षीण होणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## बांगलादेशींविरोधात धडक मोहीम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :**
सत्ताधारी भाजपने मुंबईतील अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न व बांगलादेशी घुसखोरांविरोधात अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे.

भाजपने या प्रकरणी बांगलादेशी मुस्लिम फेरीवाला मुक्त मुंबई अभियानाची घोषणा केली आहे. माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या नेतृत्वात मुलुंड येथून ही मोहीम सुरू करण्यात आली. यामुळे पुढील काही दिवस मुंबईचे राजकारण चांगलेच तापण्याची शक्यता आहे.

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी गत अनेक महिन्यांपासून बांगलादेशी घुसखोरांविरोधात रान पेटवले आहे. ते या प्रकरणी राज्यातील विविध शहरांना भेटी देऊन हा मुद्दा उपस्थित करत आहेत. आता त्यांनी मुंबईच्या मुलुंड परिसरातून बांगलादेशी मुस्लिम फेरीवाला मुक्त मोहीम सुरू केली आहे. रेल्वे स्थानक परिसर प्रवाशांसाठी मोकळा करणे व अनधिकृत घुसखोरांचे अतिक्रमण हटवणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचे सोमय्या यांनी स्पष्ट केले.

मुलुंड येथून ही मोहीम सुरू करताना भाजप नेते मनोज कोटक व मिरीह कोटेचा यांच्यासह पोलिस प्रशासन व मुंबई महापालिकेचे उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना किरीट सोमय्या म्हणाले, सर्वोच्च न्यायालय व प्रशासकीय नियमांनुसार रेल्वे स्थानकापासून १०० मीटरच्या परिसरात एकही फेरीवाला असता कामा नये. या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी भाजप आता रस्त्यावर उतरली आहे.

### पान १ वरून

**गडचिरोलीला बनवणार....**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पद्मश्री सत्यनारायण नुवाल आणि त्यांच्या पत्नी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी एआयडीचे सचिव डॉ विजय शर्मा यांनी लिहलेले मानपत्र त्यांनी वाचून दाखवले.

विदर्भात गुंतवणूक करणाऱ्या लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन, अदानी समूहाचे (एअरपोर्ट्स) संचालक जित अदानी, महिंद्रा अँड महिंद्राचे कार्यकारी संचालक राजेश जेजुरीकर, पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक जीन टोबूल, सुपरस्मेलटर्स लिमिटेडचे सीताराम अग्रवाल आणि गोयल गंगा समूहाचे अतुल गोयल यांचा सत्कार करण्यात आला.

ॲडव्हांटेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्याला महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, पंकज भोयर, माजी खासदार अजय संचेती, राज्य सरकारचे उद्योग सचिव डॉक्टर पी अनबल्गन, मुख्यमंत्र्यांचे मुख्य वित्तीय सल्लागार कौस्तुभ धवसे, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडचे सीईओ राजेश जेजुरीकर, एडवांटेज विदर्भ असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटच्या चमु पैकी एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे, सचिव विजयकुमार शर्मा, संजय गुप्ता, गिरधारी मंत्री, अशोक गोयल, प्रसन्न देशपांडे, निर्भय संचेती, प्रसन्न मोहिले, विनोद तांबी, निखिल गडकरी, राजेश रोकडे, रवी बोरटकर, प्रशांत उगेमुगे, महेश साधवानी, आलोक खंडेलवाल, अजय कपूर, महेंद्र क्षीरसागर, राजेश बागडी यांची उपस्थिती होती. याशिवाय आमदार परिणय फुके आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू मनाली क्षीरसागर देखील उपस्थित होते.

**अजित पवारांच्या मृत्यूचे....**

आरोप-प्रत्यारोप करणे अत्यंत चुकीचे असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. या घटनेतून राजकारण करण्याचा प्रयत्न दुर्दैवी आहे. हे खालच्या पातळीचे राजकारण तात्काळ थांबले पाहिजे, असा कडक इशाराही त्यांनी दिला.

मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना अजित पवार यांच्या विमानाचा धावपट्टीजवळ भीषण अपघात झाला होता. या अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. घटनेच्या चौथ्या दिवशी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या शपथविधीवरूनही चर्चा रंगल्या. मात्र, फडणवीसांनी स्पष्ट केले की, या सर्व घडामोडींमध्ये अनावश्यक राजकीय अर्थ लावणे योग्य नाही. दुःखद प्रसंगात संयम राखणे आणि कुटुंबीयांच्या भावनांचा आदर करणे आवश्यक आहे.

विदर्भाच्या औद्योगिक क्षमतेला नवी चालना मिळणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडच्या १५ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे स्वागत केले. नागपुरात उभारल्या जाणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या एकात्मिक वाहन आणि ट्रॅक्टर उत्पादन प्रकल्पामुळे रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा आणि प्रादेशिक विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ह्यअ?डव्हांटेज विदर्भह्न या कार्यक्रमात या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा करण्यात आली आणि विदभार्ला औद्योगिक केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या राज्याच्या प्रयत्नांना यामुळे बळ मिळाल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

**संभाजीनगर येथे दीडशे एकरांवर सप्लायर पार्क**

महिंद्रा समूह नागपूरमध्ये १५०० एकर क्षेत्रावर अत्याधुनिक एकात्मिक ऑटो आणि ट्रॅक्टर उत्पादन सुविधा उभारणार आहे. या प्रकल्पासोबतच संभाजीनगर येथे १५० एकरांवर सप्लायर पार्क विकसित करण्यात येणार आहे. प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर दरवर्षी ५ लाखांहून अधिक वाहनांचे आणि १ लाख ट्रॅक्टरचे उत्पादन येथे होणार आहे. या गुंतवणुकीमुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक नकाशावर विदभार्चे स्थान अधिक ठळक होणार आहे. वाहनउद्योग, शेती उपकरणे, तंत्रज्ञान आणि सप्लाय चेन या सर्व क्षेत्रांना या प्रकल्पातून चालना मिळेल. महिंद्राच्या या विस्तारामुळे नवकल्पना, रोजगारनिर्मिती आणि शाश्वत उत्पादन पद्धतींना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. राज्याला उत्पादन क्षेत्रात अग्रस्थानावर नेण्याच्या दृष्टीने ही गुंतवणूक महत्त्वाची पायरी ठरणार आहे.

## बेस्टला जमलं, मेट्रोला का नाही?

मुंबई झपाट्याने आंतरराष्ट्रीय शहराकडे वाटचाल करत आहे. उंचच उंच इमारती, कोट्यवधींचे प्रकल्प, वेगवान दळणवळण व्यवस्था यांचा गजर सातत्याने केला जातो. मात्र या तथाकथित विकासाच्या झगमगाटात शहरातील एक संवेदनशील आणि दुर्लक्षित घटक पुन्हा एकदा मागे पडत आहे...दिव्यांग नागरिक.

मुंबईची नवी लाईफलाईन म्हणून ज्याचा गवगवा केला जात आहे, त्या मेट्रोनेच प्रत्यक्षात दिव्यांगांच्या हक्कांवर गदा आणली आहे, हे स्पष्ट होत चालले आहे.

आज मुंबईत सार्वजनिक वाहतुकीची अनेक साधने उपलब्ध आहेत आणि विशेष म्हणजे दिव्यांगांसाठीचे धोरण प्रत्येक ठिकाणी वेगळे आहे.



**दिपक कैतके**
**मुंबई.**

बेस्ट बससेवेत दिव्यांगांना १०० टक्के मोफत प्रवासाची सुविधा आहे. लोकल रेल्वे व भारतीय रेल्वेमध्ये ७५ टक्के तिकीट सवलत दिली जाते. एसटी महामंडळाच्या बसेसमध्येही हेच धोरण राबवले जाते. मग कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या मेट्रोमध्येच दिव्यांगांना केवळ २५ टक्के सवलत का, हाही मूलभूत प्रश्न आहे.

त्याहून धक्कादायक बाब म्हणजे मेट्रो प्रशासनाने ही तुटपुंजी सवलतसुद्धा फक्त मासिक पासपुरती मर्यादित ठेवली आहे. दैनंदिन तिकीट काढून प्रवास करणाऱ्या दिव्यांगाला कोणतीही सवलत मिळत नाही. कामानिमित्त, उपचारासाठी, शासकीय कार्यालयात किंवा आपत्कालीन परिस्थितीत क्वचित प्रवास करणाऱ्या दिव्यांगाने मग काय करायचे? दिव्यांगत्व तेच, अडचणी तेच, पण तिकीटाचा प्रकार बदलताच सवलत संपते– हा कोणत्या प्रकारचा न्याय?

दिव्यांग व्यक्ती ही बेस्टमध्ये, रेल्वेत किंवा मेट्रोत प्रवास करताना वेगळी होत नाही. गाडी बदलली म्हणून तिच्या मर्यादा, अडथळे किंवा गरजा बदलत नाहीत. मग एकाच शहरात, एकाच सार्वजनिक सेवेत नियम आणि संवेदनशीलता का बदलते? मेट्रो ही कोणती खासगी ऐषआरामाची सेवा नसून सार्वजनिक दळणवळण व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे, याची जाणीव प्रशासनाने ठेवायला हवी.

हा विषय केवळ नैतिकतेपुरता मर्यादित नाही, तर तो थेट कायदेशीर चौकटीत मोडतो. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ सार्वजनिक वाहतूक व्यवस्था दिव्यांगांसाठी अडथळामुक्त आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारी असावी, असे स्पष्टपणे नमूद करतो. मासिक पासची सक्ती करून आणि दैनंदिन प्रवासावर सवलत नाकारून मेट्रो प्रशासन या कायद्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासत आहे.

एकीकडे तोट्यात चालणाऱ्या बेस्ट आणि रेल्वे सेवा सामाजिक बांधिलकी म्हणून दिव्यांगांना मोठ्या प्रमाणावर सवलत देतात, तर दुसरीकडे आधुनिक, नफ्याच्या तत्वावर चालणारी मेट्रो या जबाबदारीपासून हात झटकताना दिसते. हा केवळ धोरणात्मक विसंगतीचा प्रश्न नाही, तर समानतेच्या अधिकारावरचा आघात आहे.

दिव्यांगांनी आता सहानुभूतीपेक्षा हक्काची भाषा बोलण्याची वेळ आली आहे. प्रशासनाने तातडीने या अन्यायाची दखल घेतली नाही, तर जनहित याचिका, राज्य दिव्यांग आयुक्त किंवा न्यायालयीन हस्तक्षेप हे मार्ग खुले आहेत. मात्र संघषार्ची वेळ येऊ न देता, मुख्यमंत्री महोदयांनी स्वतः लक्ष घालून मासिक पासची अट रद्द करावी आणि मेट्रोतील सर्व प्रकारच्या तिकिटांवर दिव्यांगांसाठी सन्मानजनक व समान सवलत लागू करावी, हीच मुंबईतील दिव्यांग नागरिकांची रास्त आणि न्याय्य अपेक्षा आहे.

■ ■ ■

## संभाजीनगरच्या महापौरपदी समीर राजूरकर

### उपमहापौरपदी शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ६ :**
संभाजीनगर महानगरपालिकेत भाजप-शिवसेना युतीचे सत्तावाटप निश्चित झाले असून, भाजपकडून समीर राजूरकर हे महापौरपदी विराजमान होणार आहेत. दरम्यान, शिवसेनेकडून राजेंद्र जंजाळ यांना पुन्हा एकदा उपमहापौरपदाची संधी देण्यात आली आहे.



अतुल सावे म्हणाले की, राज्यात आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामधील सरकार आहे. याच गोष्टीचा विचार करत मुख्यमंत्री फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामध्ये शहराचा विकास करावा याद्दष्टीने आम्ही भाजप-शिवसेना एकत्र काम करत आहे. भाजपतर्फे महापौरपदासाठी समीर राजूरकर यांना संधी देण्यात आली आहे. त्यांना मनपामध्ये काम करण्याचा अनुभव आहे ते चांगले काम करू शकतील. तर उपमहापौर म्हणून शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांना संधी देण्यात आली आहे. शिवसेना आमच्यासोबत केंद्रात आणि राज्यात सोबत सरकारमध्ये आहे.

## धान खरेदीतील अनियमिततेवर मंत्र्यांची कठोर भूमिका

### आरमोरी सहकारी खरेदी विक्री संस्थेचे गोदाम सील

■ **महासागर प्रतिनिधी**
**देसाईगंज, दि. ६ :**
गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयात सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा पणन विभागाची महत्त्वपूर्ण आढावा गुरूवारी बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यात सुरू असलेल्या धान खरेदी केंद्रांवरील अनियमिततेचा गंभीर मुद्दा आ. रामदास मसराम यांनी उपस्थित केला.

आरमोरी सहकारी शेतकी खरेदी-विक्री संस्था अंतर्गत फरी येथे सुरू असलेल्या धान खरेदी केंद्रावर मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यात शेतकऱ्यांकडून १०० रुपयांची अनाधिकृत पावती घेणे, शासनाने निश्चित केलेल्या ४०.६०० किलो मर्यादेपेक्षा जास्त म्हणजेच ४१.६०० किलो धान खरेदी करणे, नोंदणीप्रमाणे खरेदी न करणे तसेच हमालाना शासकीय हमाली न देणे अशा गंभीर बाबींचा समावेश होता.

या सर्व तक्रारींची दखल आमदार रामदास मसराम यांनी घेतली असून, सदर विषय त्यांनी थेट सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या समोर मांडला. यावर जयस्वाल यांनी हा विषय गंभीर असून याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असे स्पष्ट केले. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

तसेच, आमदार रामदास मसराम यांच्या समवेत उपविभागीय अधिकारी (एसडीएम) यांना तत्काळ तपासणी करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. बैठकीनंतर लगेचच आमदार मसराम व एसडीएम प्रधान यांनी खरेदी केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली असता, खरेदी केंद्राच्या वतीने कोंढाळा येथील लक्ष्मी राइस मिलच्या गोदामात अनधिकृतरीत्या धान खरेदी सुरू असल्याचे आढळून आले.

तपासणीदरम्यान सदर गोडाऊनचा कोणताही वैध करारनामा नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच धानाची शास्त्रोक्त पद्धतीने मांडणी करण्यात आलेली नव्हती, वजनासाठी अधिकृत काटा उपलब्ध नव्हता आणि संस्थेकडे धान खरेदीबाबत कोणताही लेखी अथवा डिजिटल रेकॉर्ड नसल्याचेही निदर्शनास आले.

या सर्व गंभीर बाबी लक्षात घेता, एसडीएम प्रधान यांनी आमदार रामदास मसराम यांच्या समक्ष आरमोरी सहकारी खरेदी विक्री संस्थाच्या वतीने सुरू असलेले लक्ष्मी राइस मिलचा गोडाऊन तात्काळ सील करण्याची कारवाई केली. या कारवाईमुळे धान खरेदी प्रक्रियेत होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी अशा अनियमिततेविरोधात कठोर पावले उचलली जातील, असेही यावेळी प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# ‘आपले सरकार’ पोर्टल जनतेची फसवणूक करणारे हत्यार

## ऑटो क्लोज तात्काळ बंद करा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन महाराष्ट्र शेतकरी संघटनेचा इशारा

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

महाराष्ट्र शासनाच्या ‘आपले सरकार’ तक्रार निवारण पोर्टलच्या नावाखाली नागरिक, शेतकरी, शेतमजूर व सामाजिक कार्यकर्ते सर्वसामान्य जनतेची सर्रास फसवणूक होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्रशेतकरी संघटनेने केला आहे.... तक्रारींवर कोणतीही प्रत्यक्ष, स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी न करता त्या सरसकट ‘ऑटो क्लोज’ करून बंद केल्या जात असल्याने हे पोर्टल आता जनतेसाठी नव्हे, तर दोषी अधिकाऱ्यांना वाचवण्याचे साधन बनले असल्याची तीव्र टीका संघटनेने केली आहे.

असल्याचा दावा करीत असले तरी प्रत्यक्षात ‘आपले सरकार’ पोर्टलवर दाखल होणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण विकास, रस्ते, वीज, पाणी, नुकसानभरपाई, अनुदान व भ्रष्टाचारासंबंधीच्या अत्यंत गंभीर तक्रारी दडपल्या जात असल्याचे सातत्याने समोर येत आहे. जिल्हा स्तरापासून मंत्रालयापर्यंत तक्रारी फिरवून अखेरीस संबंधित विभागालाच स्वतःच्या तक्रारीवर स्वतःच उत्तर देण्याची मुभा दिली जात असल्याने ही प्रक्रिया म्हणजे लोकशाही मूल्यांची थट्टा असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा शेतकरी नेते पूर्णाजी खोडके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘आपले सरकार’ हे नाव बदलून ‘अधिकाऱ्यांचे सरकार’ ठेवावे लागेल, इतकी ही यंत्रणा जनतेविरोधात काम करत आहे. हा प्रकार

**‘आपले सरकार’ तक्रार निवारण पोर्टलवर शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक गंभीर तक्रारी दाखल आहेत. मात्र कोणतीही प्रत्यक्ष व निष्पक्ष चौकशी न करता त्या सरसकट ऑटो क्लोज केल्या जात आहेत. ही पद्धत तात्काळ बदलली नाही, तर जनतेचा विश्वास पूर्णतः ढासळेल, व इतर होणाऱ्या परिणामाला आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शासनावरच राहील.**

**–पूर्णाजी खोडके**
**अध्यक्ष, महाराष्ट्र शेतकरी संघटना**
**तथा शेतकरी नेते**

केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा नसून तक्रारी दाबून ठेवण्यासाठी राबवलेले सुनियोजित व प्रणालीगत षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. शासनाने तात्काळ दखल घेऊन ठोस व विश्वासार्ह कारवाई केली नाही, तर महाराष्ट्र शेतकरी संघटना राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडेल. प्रत्येक जिल्ह्यात निदर्शने केली जातील आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस सर्वस्वी शासनच जबाबदार राहील, असा थेट इशारा देण्यात आला आहे...

ही लढाई कोणत्याही राजकीय पक्षाची नसून महाराष्ट्रातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या न्यायासाठीची आहे. शासनाने वेळीच निर्णय न घेतल्यास जनता रस्त्यावर उतरून उत्तर देईल, असा ठाम निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे.

# यंदा जिल्हा ग्रंथोत्सव अकोटमध्ये होणार

## सोमवारी शुभारंभ; परिसंवाद, कवीसंमेलन कार्यक्रमांची रेलचेल

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

यंदा जिल्हा ग्रंथोत्सव अकोट येथील सांस्कृतिक कलाभवनात दि. ९ व १० फेब्रुवारी रोजी होणार आहे. ग्रंथोत्सवात कथाकथन, परिसंवाद, कवीसंमेलन, ग्रंथप्रदर्शन अशा कार्यक्रमांची रेलचेल असेल.शुभारंभानिमित्त सोमवार, दि. ९ फेब्रुवारीला स. १० वा. ग्रंथपूजन व ग्रंथदिंडी होणार आहे. ग्रंथोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते स. ११ वा. होईल.

ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार प्रतिमा इंगोले अध्यक्षस्थानी असतील. उद्घाटन सत्राला विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.पहिल्या दिवशी दु. २ वा. ‘मला जिजाऊ व्हायचं’ हा एकपात्री प्रयोग सादर होणार असून, त्यानंतर ‘मराठी भाषेपुढील आव्हाने’ या विषयावरील परिसंवाद साहित्यिक पुष्पराज गावंडे यांच्या अध्यक्षतेत होईल.

दु. ४ वा. भाषावैज्ञानिक व व-हाडी बोलीचे अभ्यासक रावसाहेब काळे यांच्या अध्यक्षतेत ‘सोशल मीडिया आणि वाचन’ या विषयावर परिसंवाद होईल.मंगळवार, दि. १० फेब्रुवारीला स. १०.३० वा. देशभक्तीपर गीतसंगीत कार्यक्रम, स. ११ वा. ‘आजचा वाचक, उद्याचा विचारवंत’ या विषयावरील परिसंवाद, दु. १२ वा. ‘वाचन संस्कृतीमध्ये ग्रंथालयांचे योगदान व भूमिका’ या विषयावरील चर्चासत्र होईल. दु. २ वा. ‘आजच्या विद्यार्थ्यांपुढील आव्हाने’ या विषयावर परिसंवाद होईल.

दु. ३ वा. कवी डॉ. विठ्ठल कुलट यांच्या अध्यक्षतेत कवीसंमेलन होणार असून, प्रसिद्ध गझलकार गोपाळ मापारी निवेदन करणार आहेत. दु. ४.३० वा. समारोपाचे सत्र होईल.जिल्ह्यातील वाचक, रसिक, कवीलेखक, ग्रंथप्रेमी नागरिकांनी ग्रंथोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. अतुल वानखडे यांनी केले आहे.

## चक्कीत साडी अडकून महिलेचा करुण अंत

**अकोट :** अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या पणज येथे एका महिलेचा हृदयद्रावक अंत झाल्याची घटना घडली. पणज येथील या महिलेच्या घरी चक्की आहे आणि या चक्कीत सदर महिलेच्या साडीचा पदर अडकला आणि यामध्ये या महिलेचा करुण अंत झाला.

प्राप्त माहितीनुसार सदर महिलेचे नाव जयश्री प्रमोद नवले असून तिला तीन अपत्य आहेत. घटनेच्यावेळी त्यामधील एक मुलगी या ठिकाणी हजर असल्याचेही सूत्रांनी सांगितले. अकोट ग्रामीण रुग्णालयात महिलेचा मृतदेहव आणण्यात आल्याची माहिती मिळाली.

## महानगरात श्रीश्याम फागुण उत्सवाचे आयोजन

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

अध्यात्मिक व सांस्कृतिक सेवा कार्यात सक्रिय व आतापर्यंत महानगरात अनेक ख्यातनाम राष्ट्रीय महिला पुरुष भजनकारांना आणून भक्तांना त्यांच्या भक्तिमय भजनांचा लाभ घडवून आणुया श्याम के दिवाने समूहाच्या वतीने महानगरात चतुर्थ भव्य श्री श्याम फागुण उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि १८ फेब्रुवारी रोजी या श्याम बाबांच्या फागुण उत्सव दिनी सायंकाळी ५ वाजता गीता नगर येथील रामदेवबाबा- श्यामबाबा मंदिरात आयोजित या श्याम उत्सवात खाटू धाम येथील प्रसिद्ध भजननायिका श्रुती शर्मा खाटूवाली व कोलकाता येथील भजन गायक देवांग खंडेलवाल हे संगीतमय भजने सादर करणार आहेत. यात जयपूर येथील प्रसिद्ध बँड बंदुभाई म्युझिकल ग्रुप संगीतमय साथसंगत करणार आहे.

# बिंदी घर महिला शोषण प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करा

## भाजपा महिला आघाडीची मागणी




▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

अकोला शहरातील बिंदी घर महिला शोषण प्रकरणातील आरोपींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून मास्टरमाइंडला अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. यासोबतच धर्मांतराच्या संशयित प्रकरणाचीही सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. भाजपा महिला आघाडीच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त पोलीस अधीक्षक रेड्डी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. तसेच या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही निवेदन पाठवून महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी अकोला शहरात ऑटो रिक्षांची कोणतीही शिस्त नसून गर्दीच्या ठिकाणी, रस्त्याच्या मधोमध, टर्निंग पॉइंटवर तसेच शाळांसमोर मोठ्या प्रमाणात ऑटो उभे राहत असल्याच्या तक्रारी मांडण्यात आल्या. याचा गैरवापर काही असामाजिक तत्त्वांकडून होत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. याबाबत वाहतूक विभागाने तातडीने लक्ष घालून ऑटो उभे करण्यासाठी निश्चित ठिकाणे (स्टँड) लवकरात लवकर निश्चित करावीत, अशी मागणी करण्यात आली. शाळांशी संबंधित अनेक तक्रारी पालकांकडून येत असून विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलण्यात यावीत, अशीही मागणी महिला आघाडीने केली. ऑटो चालकांकडून असभ्य वर्तन, नियमभंग आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारींची दखल घेऊन कठोर कारवाई करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले. या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षकांशीही चर्चा करून बिंदी घर प्रकरणातील आरोपी व सूत्रधारांना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. या शिष्टमंडळात भाजपा महिला आघाडी अकोला जिल्हा ग्रामीण व महानगर अध्यक्षा सौ. सुवासिनीताई धोत्रे, सौ. मंजुषाताई सावरकर, सौ. रूपालीताई काकडे यावेळी उपस्थित होते.

## थोडक्यात

### शेगाव वारीसाठी जाणाऱ्या भाविकांसाठी बेसन भाकर महाप्रसादाचे आयोजन



**अकोला :** श्री संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही शेगावकडे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी जय भवानी मित्र मंडळाच्या वतीने बेसन भाकर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम भक्तीभाव व सामाजिक एकतेचे दर्शन घडवणारा ठरणार आहे. हा महाप्रसाद कार्यक्रम शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला असून, भाकरे यांचे शेत, गायगाव पेट्रोल टाकी जवळ, गायगाव येथे तो संपन्न होणार आहे. शेगाव वारीसाठी जाणारे तसेच परिसरातील भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा व कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या उपक्रमाचे आयोजन जय भवानी मित्र मंडळ, दत्त चौक, वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला यांनी केले असून मंडळाचे अध्यक्ष नितीन दादा पाटील (वानखडे) यांच्या मार्गदर्शनाखाली हा महाप्रसाद कार्यक्रम पार पडणार आहे.

### प्रा. शारदा घाटे आचार्य पदवीने सन्मानित

**अकोट :** स्थानिक श्रीमती लक्ष्मीबाई गणगणे कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. शारदा आत्माराम घाटे यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीकडून आचार्य पदवीने नुकतेच सन्मानित करण्यात आले. त्यांच्या संशोधनाचा विषय ’डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांच्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास’ हा होता. या संशोधनासाठी त्यांना निंबा येथील प्राचार्य डॉ. विलास तायडे यांचे मार्गदर्शन लाभले. या संशोधनाकरिता घाटे यांनी प्रत्यक्ष त्यांच्या गावी तसेच कोल्हापूरला जाऊन त्यांचे साहित्य उपलब्ध करून घेतले. त्यांना श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पांडे, उपप्राचार्य डॉ. संजय कोल्हे, आदिचे सहकार्य लाभले.

# महिलांची वर्दळ असलेल्या दुकानांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टीव्ही कॅमेरे लावा

## शिवसेना उबाठा महिला आघाडी तर्फे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

अकोल्यात नुकत्याच उघडकीस आलेल्या ‘ बिंदी घर ‘ प्रकरणामुळे महिलांसोबत कोणत्या नीच दर्जाचे प्रकरण घडू शकते याचा अनुभव अकोले करांना नुकताच आला आहे. अशा भयंकर प्रकरणांमुळे एक प्रकारे महिलांची सुरक्षितताच धोक्यात आलेली आहे. या गंभीर बाबीचा विचार करून महिलांची खरेदी असलेल्या दुकानांमध्ये दुकान मालकांनी तसेच ज्या ठिकाणी महिलांची मोठी वर्दळ असते अशा सार्वजनिक ठिकाणी प्रशासनाने सी. सी. टीव्ही कॅमेरे तातडीने लावावेत. अशी मागणी शिवसेना महिला आघाडीच्या



उबाठा जिल्हा संघटिका सौ. सरिता वाकोडे व त्यांच्या महिला सहकाऱ्यांनी केली आहे. या मागणीचे एक निवेदन त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, व सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय गवई यांना सादर केले आहे या निवेदनात अशीही मागणी करण्यात आली आहे की, ज्या दुकानांध्ये महिला खरेदी करण्यासाठी जातात त्या दुकानांमध्ये कोणतीही एक्स्ट्रा खोली अथवा कंपार्टमेंट असू नये, ज्या भागात महिलांच्या वस्तूंची जास्त दुकाने आहेत त्या भागात महिला व पुरुष पोलिसांची ड्युटी लावून त्या भागात त्यांची गस्त वाढवावी, महिलांची अशी दुकाने किंवा कॅफे भाडेतत्त्वावर असल्यास आपल्या जागेत काही वाईट कृत्य तर घडत नाही ना, याबाबत दुकान मालकाने सतर्क असले पाहिजे, याशिवाय ज्या ठिकाणी कॅफे चालतात त्या भागात सुद्धा पोलिसांची गस्त लावण्यात यावी.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**अकोला** :आदिवासी विकास विभागातर्फे परदेशातील शैक्षणिक संस्थांत २०२६ २७ या वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएडी अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविले आहेत. परदेशातील संबंधित शैक्षणिक संस्था जागतिक क्रमवारीत २०० च्या आत असावी. उमेदवार व उमेदवाराचे आई, वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. उमेदवाराच्या पालकांचे, कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वषातील एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न.

# गजानन महाराज प्रकटदिनासाठी रेल्वेचा मोठा दिलासा

## भुसावळ–नागपूर विशेष ट्रेन जाहीर; शेगाव, अकोला, मुर्तिजापूर मार्गावर भाविकांची सोय

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

संत गजानन महाराज प्रकटदिनानिमित्त शेगावकडे जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन केंद्रीय रेल्वेने भुसावळ-नागपूर-भुसावळ विशेष ट्रेन (०११०१/०११०२) जाहीर केली आहे. ही विशेष सेवा ७ व ८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रत्येकी एक फेरी धावणार आहे. भुसावळहून सकाळी ७.५० वाजता निघणारी ही गाडी बोदवड, मलकापूर, नांदुरा, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा व वर्धा मार्गे दुपारी २.३० वाजता नागपूरला पोहोचणार आहे. परतीची गाडी नागपूरहून



सायंकाळी ३.३० वाजता सुटणार आहे. १२ डब्यांच्या मेमू रेकने चालणारी ही विशेष ट्रेन विदर्भातील भाविकांसाठी मोठा दिलासा ठरणार असून गर्दी नियंत्रणासाठी रेल्वे प्रशासन सज्ज झाले आहे. सर्व स्थानकांवर वेळापत्रक प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# मध्यवर्ती बसस्थानकावर कुष्ठरोगाबाबत भव्य जनजागृती कार्यक्रम

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत अकोला शहरातील मध्यवर्ती बसस्थानक येथे दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता भव्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा उद्देश कुष्ठरोगाविषयी समाजातील गैरसमज दूर करून लवकर तपासणी व उपचारासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे हा आहे. या जनजागृती कार्यक्रमास डॉ. रणमले सर, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग विभाग), अकोला तसेच डॉ. चिमणकर एम.ओ., कुष्ठरोग विभाग, अकोला यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमांतर्गत आज (जनजागृती वार्ता) कुष्ठरोगाची लक्षणे, उपचाराची उपलब्धता, तसेच हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, याबाबत प्रभावी संदेश दिला जाणार आहे. प्रवासी, नागरिक व बसस्थानक परिसरातील लोकांना थेट संवादातून माहिती मि

**नागरिकांना आजाराविषयी माहिती; तज्ज्ञ डॉक्टरांची प्रमुख उपस्थिती**

ळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कुष्ठरोग हा अनुवंशिक नसून जंतुसंसर्गामुळे होणारा आजार आहे आणि वेळीच निदान झाल्यास औषधोपचाराने पूर्णपणे बरा होतो, हे या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात येणार आहे.

तसेच सर्व सरकारी व निमसरकारी दवाखान्यांमध्ये मोफत तपासणी व उपचार उपलब्ध असल्याची माहितीही देण्यात येणार आहे.नागरिकांनी या जनजागृती कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व कुष्ठमुक्त अकोला जिल्हा घडवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# रंगमंचावर ‘संभाजीराजे’ साकारणाऱ्या कलावंतांचा

## छावा संघटनेतर्फे कौतुक व सत्कार



▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

शिवपुत्र स्वराज्य रक्षक संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित महानाट्य अतिशय प्रभावीपणे सादर करणाऱ्या तुळसाबाई कावल विद्यालय पातुर येथील विद्यार्थ्यांचा छावा संघटनेतर्फे सत्कार करण्यात येऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

पातुर येथे तुळसाबाई कावल विद्यालयाचे प्रांगणात शेकडो विद्यार्थ्यांचे उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी बेरार एज्युकेशन सोसायटी पातूर चे व्यवस्थापक तथा माजी प्राचार्य विजयसिंह गहिलोत होते.

तर प्रमुख अतिथी म्हणून छावा संघटनेचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, दास मोबाईलचे संचालक रितेश मिर्झापुरे, सौ. स्नेह प्रभादेवी गहिलोत, प्राचार्य अंशुमन सिंह गहिलोत, छावाचे जिल्हा संघटक निवृत्ती वानखडे, उपाध्यक्ष गोपाल पाटकर, बाळासाहेब लाहोळे, डॉ. संतोष भिसे, अनिरुद्ध भाजीपाले, श्रीनाथ पहेलवान, देवेंद्र मोहोकार, तालुकाप्रमुख सोनु गिरी उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारी रोजी सादर करण्यात आलेल्या या संभाजी महानाट्यातील सर्वच कलावंतांनी दमदार भूमिका करून साक्षात संभाजी युग प्रेक्षकांसमोर सादर केले.

छावा संघटनेने या महानाट्याची दखल घेऊन या नाटकातील विद्यार्थी कलावंतांचा कौतुक सोहळा घडवून आणला.

# कृषी विद्यापीठ परिसरातील रस्ता अखेर दुरुस्त,पाठपुराव्याला यश

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या माजी प्रदेश सरचिटणीस सुनीता ताथोड यांनी १० जानेवारी २०२५ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरातील रस्त्याच्या दुरुस्तीबाबत आमदार रणधीर सावरकर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. या मागणीनंतर त्यांनी सातत्याने पाठपुरावा समस्येकडेकरत नागरिकांच्या लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधले.या पाठपुराव्याची दखल घेत आमदार सावरकर यांनी तत्काळ सकारात्मक भूमिका घेत सदर रस्त्याची दुरुस्ती करून देण्याचे आदेश दिले. परिणामी, कृषी विद्यापीठ परिसरातील गुडमॉर्निंग पथक प्रेमी, महिला तसेच स्थानिक नागरिकांना आता चांगल्या दर्जाचा व सुरक्षित रस्ता उपलब्ध झाला आहे. या रस्त्यामुळे सकाळी व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, परिसरातील वाहतूकही अधिक



**गुडमॉर्निंग पथक प्रेमींना दर्जेदार रस्त्याची भेट**
**आ.रणधीर सावरकर यांचा सकारात्मक निर्णय**

सुरळीत झाली आहे. या कामासाठी आमदार सावरकर यांच्यासह नगरसेवक जयंत मसने, नगरसेविका सुनीता अग्रवाल यांचे सुनीता ताथोड, श्रद्धा कौसल, सीमा चव्हाण, कविता पारस्कर, वृंदा कोरपे, उषा ठाकरे, शोभा बोळे, पुष्पा बनसोड, संगीता जैन, सुषमा निचळ, सावरकर यांच्यासह स्थानिक नागरिकांनी मनापासून आभार मानले आहेत. लोकप्रतिनिधींच्या तत्परतेमुळे आणि जनहिताच्या दृष्टिकोनातून घेतलेल्या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## थकित करापोटी २ मालमत्तांवर सीलची कारवाई

▪अकोला,दि.६ (प्रतिनिधी)▪ ६ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील क्षेत्रातील उत्तर झोन अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोला येथील वार्ड क्र. उ- ६ मालमत्ता क्रं. १५० धा. कृषी उत्पन्न बाजार समिती तर्फे रामगोपाल तोष्णीवाल यांच्याकडे २०१७-१८ पासून आज पर्यंत एकूण रक्कम रू. १,८६,७७८/- आणि मालमत्ता क्रं. १४९ धा. कृषी उत्पन्न बाजार समिती तर्फे जैन ट्रेडिंग कंपनी यांच्याकडे २०१७-१८ पासून आज पर्यंत रक्कम रू. ८०,२१८/- एवढा मालमत्ता कर थकीत असल्याने सदर दोन्ही मालमत्तांवर सील लावण्याची कार्यवाही करण्यात आली. या कारवाईत सहाय्यक अधीक्षक पंकज जोगळेकर, वरिष्ठ लिपिक हेमंत शेळवणे, लिपिक भीमचंद्र रामटेके, मोहन घाटोळ आदींची उपस्थिती होती.अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांनी आपला थकित व चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा एकरकमी करून सील, जप्ती व लीलाव सारख्या अप्रीय कारवाई टाळावे असे आवाहन मनपा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

# ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापनासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठास राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक



■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे द्वारा ऊर्जा संवर्धन आणि व्यवस्थापनातील उत्कृष्टतेसाठी १८ व्या राज्यस्तरीय पुरस्काराकरीता अर्ज मागविण्यात आले होते. या पुस्काराचे सादरीकरण विद्यापीठ गटासाठी १९ सप्टेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे येथे झाले. नुकतेच महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (चएऊअ), पुणे यांचेकडून राज्यस्तरीय पारितोषिकाची घोषणा करण्यात आली असता विद्यापीठ गटामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यास सलग तिसऱ्या वर्षी प्रथम पारितोषिक मिळाले. या पुरस्कारांच्या माध्यमातून उद्योग, संस्था, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था (छऋजी) तसेच इमारती येथे ऊर्जेचा कार्यक्षम वापर, व्यवस्थापन व ऊर्जा संवर्धनाच्या उपक्रमांना गौरविण्यात येते. या पुरस्कारांचा उद्देश राज्यभर ऊर्जा कार्यक्षमतेचा प्रसार करणे तसेच शाश्वत व पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे हा आहे. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या नेतृत्वात सौर ऊर्जेच्या प्रभावी वापरातून ऊर्जा संवर्धनात विद्यापीठाची भरीव कामगिरी यामुळे हे पारितोषिक विद्यापीठास मिळाले. विविध २८ गटामध्ये या पुरस्कारासाठी सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यापीठ गटामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठास प्रथम पारितोषिक मिळाले. या प्रतियोगितेमध्ये विद्यापीठाकडून डॉ. सुरेंद्र काळबांडे, अधिष्ठाता (कृषि अभियांत्रिकी विद्याशाखा) तथा विभाग प्रमुख, नवीकरणीय ऊर्जा अभियांत्रिकी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांनी मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे मार्गदर्शनात सादरीकरण केले. सद्यस्तिथीत ऊर्जा संवर्धन आणि व्यवस्थापन अतिशय महत्त्वाचा घटक आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात मा. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे मार्गदर्शनात ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापनेत डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी पुढाकार घेऊन आतापर्यंत १९५ किलोवॅट व ४०० किलोवॅट ऊर्जा क्षमतेचे छतावरील वीज वाहक सोलर पी. व्ही. ऊर्जा प्रकल्प अकोला येथील विद्यापीठ परिसरात उभारण्यात आले आहेत. या प्रकल्पाद्वारे २०२४-२५ या आर्थिक वर्षात विद्यापीठाची वीज बिलावरील वार्षिक बचत अंदाजे ५२ लाख रुपये एवढी झाली. तसेच डॉ. सुरेंद्र काळबांडे यांचे मार्गदर्शनात ६ किलो वॉट बायोगॅस आधारित विद्युत निर्मिती युनिट, ३ किलो वॉट पवन -सोलर ऊर्जा हायब्रीड युनिट, ३ किलो वॉट ऑफ ग्रीड ऊर्जा निर्मिती युनिट.

# कारंजा रस्त्यावर रक्तरंजित थरार

## दोघांचा मृत्यू,चार तरुण मृत्यूशी झुंज देत

■मुर्तिजापुर,दि.६ (प्रतिनिधी)■

मुर्तीजापूर मार्गे कारंजाकडे भरधाव वेगाने निघालेल्या होंडा थठ-त (चक ३६ न ०९०९) कारचे नियंत्रण सुटताच ग्राम उमरी अरब परिसरात काळाने घाव घातला. क्षणात आनंदाचा प्रवास भीषण अपघातात बदलला. या दुर्घटनेत रोहित भगवानदास रील (२५, रा. वाल्मिक नगर, कारंजा) व संकेत राजेश मेश्राम (२५, रा. गवळीपुरा, कारंजा) यांचा मृत्यू झाला. तर यशवंत घनश्याम राठोड (३१), अक्षय संजय रोकडे (२७), ओम दीपक मुंदे (१९) व आर्यन अमोल अंभोरे (१९) हे चौघे गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुट्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय चंदन वानखेडे, एएसआय दीपक कानडे तसेच पो.कॉ. शंकर खेडकर, गणेश ठाकरे, गजानन सयाम व रामहरी केंद्रे यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेत मदतकार्य राबवले. जखमींना तत्काळ श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख रेफर स्पेशालिस्ट उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने जखमींना पुढील उपचारासाठी अकोला शासकीय रुग्णालयात रेफर करण्यात आले. भरधाव वेगामुळेच अपघात घडल्याची प्राथमिक माहिती असून ग्रामीण पोलीस अधिक तपास करीत आहेत. परिसरात शोककळा पसरली आहे.



# वैभव फुलाडी उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराने सन्मानित



■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील शाखाधिकारी वैभव फुलाडी यांना योगतज्ञ श्री विठ्ठल राव जिभकाटे 'उत्कृष्ट कर्मचारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. २०२४ २५ वर्षाकरिता हा पुरस्कार होता.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या चाळीसाव्या दीक्षांत समारोहात मान्यवरांच्या हस्ते त्यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. वैभव फुलाडी उच्च विद्या विभूषित असून, संपूर्ण कृषी विद्यापीठात उत्कृष्ट, अभ्यासू व स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. मागील अनेक वर्षापासून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कार्यरत असणारे वैभव फुलाडी लोकप्रिय कर्मचारी म्हणून ओळखले जातात. प्रत्येकाला मदत करणे व आपल्या कामाप्रती असणारी निष्ठा ही त्यांची जमेची बाजू आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे संपूर्ण कृषी विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# आरटीई अंतर्गत एक हजार ८८३ जागांवर मिळणार विद्यार्थ्यांना प्रवेश

■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायद्यांतर्गत जिल्ह्यातील १६० शाळांनी नोंदणी केली आहे. या अंतर्गत जिल्ह्यात प्रवेशासाठी एक हजार ८८३ निश्चित झाल्या आहेत. आता पालकांना प्रवेश प्रक्रिया सुरु होण्याची प्रतीक्षा आहे. नोंदणीची प्रक्रिया सुरू असल्याने ही संख्या दोनशे शाळा पर्यंत जाण्याची शक्यता आहे.

असा अंदाज शिक्षण विभागाने वर्तवला आहे.शिक्षण हक्क कायद्यानुसार खाजगी विनाअनुदानित आणि स्वयं अर्थसाहित शाळा मधील २५% राहतील जागांवर आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेचा पहिला टप्पा ९ जानेवारीपासून सुरू झाला आहे पहिला टप्प्यात पंचवीस टक्के प्रवेश प्रक्रियेनुसार बिगर शासकीय आणि अर्थसाहित शाळांच्या ऑनलाइन नोंदणी आणि पडताळणीसाठी संबंधित व्यवसायावर लिंक सक्रिय करण्यात आल्या होत्या.

३० जानेवारी रोजी सायंकाळी सहा पर्यंत जिल्ह्यातील १७० शाळांनी आपली नोंदणी पूर्ण केली असून त्यामध्ये १८८३ जागा आरक्षित ठेवण्यात आले आहेत. यामध्ये कोणतीही चुकीची किंवा दिशाभूल करणारे माहिती नोंदवली जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे समाजातील दुर्बल घटकातील मुलांना दर्जेदार शिक्षण आणि समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी आरटीई २५% प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. या संदर्भात संबंधित शाळा प्रशासनाने निर्धारित गांभीर्याने आणि कार्यवाही करावी. आरटीई अंतर्गत मोफत प्रवेशासाठी अर्ज करताना पालकांनी काही महत्त्वाची कागदपत्रे सादर करणे आवश्यक असते.

त्यामध्ये रहिवासी पुरावा, उत्पन्नाचे प्रम ाणपत्र, जन्माचा दाखला तसेच ओळखीचा पुरावा (आधार कार्ड किंवा अन्य वैध ओळखपत्र) आवश्यक आहे. जात संवर्गातील बालकांसाठी जातीचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

# ई केवायसी दुरुस्तीची अंतिम संधी

■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' या योजनेंतर्गत दि.३१.१२.२०२५ पर्यंत ज्या लाभार्थी महिलांनी श-घधउ प्रक्रिया पूर्ण केली आहे. तथापि, सदर प्रक्रिया पूर्ण करताना 'लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य नियमित / कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/ उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतचा पर्याय निवडताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडण्यात आलेला आहे. अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईन श-घधउ मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी दि.३१.०३.२०२६ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली आहे उपरोक्त अनुषंगाने योजनेच्या पोर्टलवर सुधारणा करण्यात आली आहे. यापुढे कोणत्याही परिस्थितीत सधारण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी असे आवाहन महिला व बाल विकास विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# शास्ती अभय योजना लागू करून दिलासा द्या : निलेश देव

■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

शहरातील सर्वसामान्य मालमत्ता धारकांना दिलासा मिळावा तसेच महानगरपालिकेची थकीत कर वसुली वाढावी, यासाठी थकीत मालमत्ता करावरील शास्ती (दंड) माफ करणारी ङ्ग शास्ती अभय योजना' तातडीने लागू करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे गटनेते तथा नगरसेवक नीलेश रामकृष्ण देव यांनी केली आहे. याबाबत त्यांनी ३ फेब्रुवारी रोजी अकोला महानगरपालिकेच्या म हापौर शारदा खेडकर यांना सविस्तर निवेदन दिले.

या सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून महापौरांनी लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निलेश देव यांनी व्यक्त केली आहे. या निर्णयाकडे शहरातील हजारो मालमत्ता धारकांचे लक्ष लागले असून, महापालिका प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे अकोलेकरांचे लक्ष केंद्रित झाले आहे. खाजगी कंत्राटी कर वसुलीमुळे नागरिकांमध्ये असंतोष अकोला शहरात खाजगी कंपनीमार्फत कर वसुलीची कंत्राटी पद्धत लागू करण्यात आली होती.

महाराष्ट्रात इतर कोणत्याही महानगरपालिकेत नसलेली हीपद्धत अकोल्यात राबविण्यात आल्याने कर वसुली प्रक्रियेत अनेक त्रुटी निर्माण झाल्या. चुकीच्या व अव्यवस्थित कर आकारणीमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरसमज, नाराजी व असंतोष निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दसरा- दिवाळीत राबविलेल्या योजनांचा नागरिकांना लाभ मिळाला नाही. मागील वर्षी प्रशासकीय काळात दोन वेळा शास्ती अभय योजना राबविण्यात आल्या होत्या. मात्र या योजना ऐन दसरा व दिवाळी या सणांच्या काळात लागू करावी.

# धाबेकर नगराच्या कीर्तन उत्सवात हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे कीर्तन संपन्न

## उद्या काल्याच्या कीर्तनाचे होणार सांगता

■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

अकोला-खडकी परिसरातील धाबेकर नगरात संत गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव निमित्त संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगरच्या वतीने आयोजित कीर्तन उत्सवात गुरुवारी वारी भैरवगड येथील कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज वाघ यांची पंचम किर्तन सेवा संपन्न झाली.आपल्या ओजस्वी व धीरगंभीर वाणीने हभप वाघ महाराज यांनी वारकरी संप्रदायाची महती व संतांची गाथा सांगितली. जीवनाचे मूल्य ठरविताना कोणत्या चाकोरीतून मार्गक्रमण करून या जगात येणाचे सार्थक करावे याचे सूत्र प्रतिपादित केले.कीर्तन प्रारंभी समितीच्या वतीने हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे स्वागत करण्यात आले.किर्तन उत्सवात आज शनिवार.दि. ७ फेब्रुवारीला मुंबईचे हभप चकोर महाराज बाविस्कर यांचे कीर्तन होणार आहे.तसेच दुपारी ४ वाजता कथास्थळ पासून परिसरात श्रींची पालखी शोभायात्रा निघणार आहे. उद्या दि ८ फेब्रुवारी रोजी संत गजानन महाराजांचा



प्रगटदिन उत्सव असुन सकाळी १० वाजता हभप भागवत महाराज देशमुख यांचे काल्याचे कीर्तन व महाआरती होणार आहे, रात्री ७ वाजता दरबार गजानन हे संगीतमय संत गजानन महाराज नाट्याचे सादरीकरण होऊन या महोत्सवाचे समापन होईल. परिसरातील सर्व भक्तांनी या उत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगर व खडकी बु. च्या समस्त नागरिकांकडून करण्यात आले आहे.

# थकित करापोटी मालमत्तावर सीलची कारवाई

■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

६ जानेवारी २०२६ रोजी मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहा. आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात अकोला म हानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत रॉयल स्टेट राऊतवाडी अकोला येथील वार्ड क्रं. ए-७ मालमत्ता क्रं. ३५५६, धा. मिलिंद ठोंबरे यांचेकडे २०१५-१६ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये ८८२५४/- एवढा मालमत्ता कर थकित दुकान असल्याने, तसेच मलमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत जप्ती पथक प्रमुख सुधीर मिसुरकर संतोष राजे, राजेश साळुंखे, संतोष पांडे आदि होते.

# महानगरात शिवधारा वार्षिक महोत्सव संपन्न





■अकोला,दि.६ (प्रतिनिधी)■

स्थानिक सिंधी कॅम्प परिसरातील शिवधारा आश्रमात शिवधारा वार्षिक महोत्सव मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला. यामध्ये श्री शिवधारा अमृत ग्रंथ पाठ पठण पारायण झाले. शिवधारा महिला व कन्या मंडळाने सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.दुसऱ्या दिवशी मोफत भव्य रोग निदान शिबीर संपन्न झाले.यात हृदय रोग तज्ञ डॉ. सुमीत अग्रवाल, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. सुमीत मोटवानी, डॉ. पूजा मोटवानी, डॉ. आरती अग्रवाल, डॉ. भावेश गुरदासानी यांनी विविध आजारांची तपासणी करीत सेवा दिली. फ ुल बॉडी चेकअप मशीनद्वारे तपासणी करून रुग्णांना आहारातील बदल करून निरोगी राहण्याचा संदेश देण्यात आला. शिबिरात अनेक प्रकारची मोफत रक्त तपासणी करण्यात आली. याचा शेकडो समाजबंधूंनी लाभ घेतला.या उत्सवात शिवधारा सामूहिक जनेऊ पवित्र संस्कारही घेतला गेला, ज्यात १७ बटुकांना लाभ मिळाला. यात अकोला, पांडरकवडा, अमरावती, कारंजा येथील बटुक सहभागी होते. सत्संग कथेचा लाभ भक्तांना आपल्या ओजस्वी वाणीद्वारे पू. पू. संत डॉ. संतोष देवजी महाराज यांनी दिला. त्यांनी आपल्या गुरुदेव भगवान १००८ सतगुरु स्वामी शिवभजन जी महाराज यांची महिमा गायली. उत्सवाच्या तीन दिवसांत पाच कुटुंबांवर कृपा झाल्याबाबत सविस्तर सत्संग झाला.महाराज श्रींच्या पहिल्या दिवसाच्या सत्संगाचे विषय होते - 'छोट्या-छोट्या घटनांवरच आधारित आहे आमचे दुःख किंवा सुख!' दुसऱ्या दिवशीचा विषय 'जसे विचार, तसे भविष्य' आणि तिसऱ्या दिवशी 'भगवान आपल्या सगळ्यांना पाहत आहे' हे विचार व्यक्त करण्यात आले.

# सोनाळा पी.एम जिल्हा परिषद प्राथमीक मराठी शाळा स्नेह सम्मेलन सपंन्न

■सोनाळा,दि.६ (प्रतिनिधी)■

सोनाळा ता सग्रामपुर येथील पी एम श्री जिल्हापरीषद मूलाची मराठी शाळेमधे वार्षिक स्नेह सम्मेलन अती ऊत्साहाने मूलाचे अंगी असलेल्या कलागूणानी पार पडले सदरहू कार्यक्रमाचे ऊदघाटन सोनाळा येथील पोलीस स्टेशनचे कर्त्यव्यदक्ष ठानेदार श्री खोणे साहेब यांचे हस्ते दिप प्रजलन झाली तर मुलानी देशभक्ती गित विनोदी नाटीका थरारक दृष्य हभप ईदोंरीकर महाराजाचे सम ाजप्रबौधन कीर्तनझाकी, शूर हिदवी स्वराज्य सस्थांपक छत्रपती शिवाजीमहाराजाचा पोवाडा , नवराञदेवी लावण्या अशा विवीध कलागूणाची हुबेहूब सास्कृतीक कार्यक्रम मुलानी सादर करत ऊपस्थीत पालकवर्ग गावर्कयाची मने जींकली तर सादर केलेल्या प्रत्येक न्यृत्य असो की ईतरही प्रयोगात आत्मविर्श्वास व गूरूजनांचे मार्गदर्शन या



कार्यक्रमातुन दिसून आले तसेच विध्यार्थाचे अगांतील कला गुणाची माहीती सर्वाना व्हावी अभ्यासाबरोबर कलागूण दिसून आलेत तर विशेष प्रश्नमजुंशा कार्यक्रमातुन महिलासाठी कार्यक्रमाला ऊतस्फुर्त प्रतीसाद लाभला यामधील विजेता महिलांना शाळेच्या वतीने पैठणी व आकर्षक भेटवस्तु देन्यात आल्या ! या ऊपक्रमामूळे सोनाळा गावात वेगळाच आनंद निर्मान झाल्याचे दिसून आले या स्नूह सम्मेलन कार्यक्रमाला सोनाळ्याचे सरपंच हर्षल खंडेलवाल, तंटामूक्तीचे अध्यक्ष महादेव चवरे,शाळा व्यवस्थापन समीतीचे अध्यक्ष शकंरराव कांडेलकर, ऊपाध्यक्ष अर्चणाताई सातव, बिट अमलदार विनोद शिवरे, राजेद्र विर्श्वकर्मा, प्रमोद खोद्रे, डॉ श्रिराम दाभाडे,केद्रप्रमूख भिमराव वानखडे,स्वप्निल देशमूख,पर्यवेक्षक पीटीयासर गोपाल बुंदेसर पालकप्रतीनीधी भिमाआप्पा खांदेशे, शाळा व्यस्थापन समीतीचे सर्व सदस्य हजर होते यावेळी कार्यक्रमात विद्यार्थाना ग्रामस्थाकडून बक्षीसाची लयलूट करन्यात आली सदर कार्यक्रमाचे सचालन नीवेदक म्हनून निलेश घाटोळ सर,निलेश तायडेसर, यांनी सूदंरपणे केले आभाराची जबाबदारी खांदेशे सरानी पार पाडली

# विद्यार्थ्यांना तणावमुक्त जीवन ठेवणं काळाची गरज : ऋतुंबरा धोत्रे

■तेल्हारा,दि.६ (प्रतिनिधी)■

तेल्हारा येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्रारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यासाठी स्वतः ला सिद्ध करून घेण्यासाठी परिक्षा काळात तणाव निर्माण होते. म्हणून त्यांना तणाव मुक्त राहण्यासाठी वेळेचं नियोजन व व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन कु ऋतुंबरा शिरिष धोत्रे यांनी केले आहे. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास गांवडे मुख्याध्यापक हे होते.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना मोलाचं मार्गदर्शन केले आहे यावेळी विद्यार्थ्यांना तणावमुक्त जीवन ठेवण्यासाठी काळाची गरज आहे असे . मोलाचे मार्गदर्शन केले आहे कार्यक्रम चे



सुत्रसंचालन शांतीकुमार सावरकर यांनी केले आहे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुनील वंजारी शिक्षक प्रतिनिधी, बळीराम कुवारे तूषार जाधव अंकेश भांबुरकर धनंजय भंगाळे बी जी पवार,भारत भोयर, श्रीधर लोखंडे, गाढवे सर अभिजित हिंगणकर सौ शर्वरी हिंगणकर कु प्रियंका नंदाने तेजराव कडू यांनी परिश्रम घेतले आहेत यावेळी उपस्थित सर्व म ान्यवर मंडळी चे आभार कु खुशी शामसकार हिने मानले आहेत .

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८६ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील रमाबाई आंबेडकरांचे योगदान

७ फेब्रुवारी हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्रय आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईंचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघषार्मागे रमाबाईंच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

---------------

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्रय, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती. शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईंच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती.

बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.

अत्यंत लहान वयात रमाबाईंचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा भार रमाबाईंनाही समानतेने पेलावा लागला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईंवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते. अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले. एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते.

रमाबाईंच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी जीवनधर्म मानले. रमाबाईंचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.



रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या.

अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईंच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे, आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्रय हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही महत्त्वाचे असते.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले. आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईंच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीयार्ने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कायार्मागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईंचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते.

त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# झपाटलेपण असावं तर असं....

(कालच्या अंकावरून पुढे)

---------------------

अंतिम भाग
डॉ. सोमनाथ रोडे
लातूर
७५१७९८५६९०

माधव बावगे यांनी आयुष्याच्या सत्तरीपर्यंत जे झपाटलेपण दाखविले त्यामुळे त्यांना शाहू कॉलेजचा शाहू भूषण पुरस्कार (१९९३), यशवंतराव चव्हाण स्मृती युवा पुरस्कार (१९९४), महाराष्ट्र दलित साहित्य अकादमी, भुसावळचा कर्मठ समाजसेवक पुरस्कार (१९९६), रॅशनॅलिस्ट टीचर्स अँड थिंकर्स अकॅडमी, यवतमाळचा विज्ञाननिष्ठ समाजशिक्षक पुरस्कार (२००१), लातूर जिल्हा रौप्य महोत्सवी समितीचा उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार (२००८), सामाजिक कृतज्ञता निधी, पुणे यांचा डॉ. राम आपटे प्रबोधन पुरस्कार (२००९), प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावे दिला जाणारा प्रजासत्ताक भारत डोंबिवलीचा अंधश्रद्धा निर्मूलन पुरस्कार (२०१२), महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिकेचा प्रबोधन पुरस्कार (२०१३), अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र, सांगली तर्फे दिला जाणारा वार्तापत्राचा शतकवीर पुरस्कार (२०१५), महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचा औरंगाबाद (छ. संभाजीनगर) चा लक्ष्यवेधी पुरस्कार (२०२२), छ. शिवाजी महाराज व कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे बाबा जन्मोत्सव सोहळा यांच्या वतीने दिला जाणारा कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे महाराज महाराष्ट्र भूषण पुरस्कार (२०२४), राऊ जीवन गौरव पुरस्कार (२०२५) अशा विविध ४१ पुरस्कारांनी सन्मानित लातूरच्या मातीत जन्मलेला एका सामान्य मजुराचा मुलगा आपल्या स्वकर्तृत्वाच्या बळावर वरील पुरस्कारांचा मानकरी ठरला आहे.

मराठवाड्यात आणि महाराष्ट्रात समर्पितवृत्तीने कार्य करून माधव बावगे यांनी तरुणांसाठी एक वेगळाच आदर्श घालून दिला आहे. शून्यातून जन्माला आलेला एक सामान्य कार्यकर्ता महाराष्ट्रातील एका व्यापक ऐतिहासिक चळवळीचा केंद्रबिंदू झाला आहे. कार्यकर्त्यांचे फार मोठे मोहोळ त्यांच्या अवतीभोवती दिसून येते.

सौ. मंगलताई बावगे यांनीही माधव बावगे यांच्या कार्याला सर्वार्थाने साथ दिल्यामुळे बावगे यांच्या कार्याला गतिमानता प्राप्त झालेली दिसून येते. समाजामध्ये मंगलमय वातावरण निर्माण करण्यासाठी माधव मंगलचे हे रचनात्मक कार्य मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाला विज्ञानवादी व विवेकनिष्ठ समाजनिर्मितीला नवी दिशा प्राप्त करून देईल. आज ७० व्या वर्षांतही माधव बावगे यांच्या कार्याचा जोम, उत्साह आणि वेग कोणत्याही तरुणाला लाजविणारा असाच आहे. युक्ती आणि कृतीमध्ये साधर्म्य ठेवणारे जे मोजकेच निष्ठावंत कार्यकर्ते मी महाराष्ट्रात पाहिले, त्यात श्री माधव बावगे यांचे स्थान अढळ आहे.

राष्ट्रीय युवा पुरस्काराचे मानकरी, सामाजिक कृतज्ञता पुरस्काराचे सन्मानकर्ते, शाहू महाविद्यालयाचे शाहू भूषण, महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्काराचे विजेते आणि महाराष्ट्रातील बहुविध सामाजिक चळवळींच्या पुरस्कारांचे मानबिंदू ठरलेले माधव बावगे बाबा आमटे एकता अभियानातर्फे दिला जाणारा बाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता या पुरस्काराने सन्मानित झालेत.

या पुरस्काराच्या माध्यमातून भावी काळात माधव बावगे यांच्या सळसळत्या चैतन्याचा आणि ऊर्जस्वल सामर्थ्याचा आविष्कार पाहण्याची संधी लाभो, हीच शुभकामना !

■ ■ ■




# नैसर्गिक संसाधनाची होणारी लूट मानवी जीवनावर परिणाम करणारी

गेल्या काही वर्षात मानवाने जल, जमीन व जंगल या नैसर्गिक संसाधनाची प्रचंड लूट करण्यात आली, आजही ती तशीच सुरु आहे. त्याचे परिणाम आता मानवी जीवनावर होऊ लागले आहेत.

मानवी जीवनात या तिन्ही नैसर्गिक संसाधनांला अनन्यसाधारण महत्व असताना, मूठभर धनदंडग्यांना झुकते माप देत सरकारने सध्या मानवाला देशोधडीला लावण्याचे धोरण अवलंबले आहे.

जमिनीची भूक काही मिटता मिटत नाही, तर ९० च्या दशकापासून जल व जंगल यावर सरकार बड्या उद्योगसमूहांची वक्रदृष्टी पडू लागली आहे. त्यामुळे अवघ्या ४० वर्षात ही सारी नैसर्गिक संसाधने हळूहळू इतिहासजमा होऊ लागली आहेत.

विकासासाठी जमिनीचे संपादन, या गोंडस नावाखाली शेती/बागायतीच्या सुपीक जमिनी सरकारने बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांच्या घश्यात घालण्याचे धोरण अवलंबले आहे. सरकारच्या या विनाशकारी धोरणामुळे ग्रामीण भागातील भूमिपुत्र मात्र पार उध्वस्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून वसईच्या समुद्रात रिंगण तयार झाले असून या रिंगणात आता बोटी अडकू लागल्या आहेत. त्यामुळे समुद्राचा राजा, अशी ओळख असलेला मच्छीमार देखील सध्या भितीच्या सावटाखाली आला आहे. या घटनेच्या मागची कारणे शोधण्यासाठी यंत्रणा सक्रिय झाल्या असल्या तरी सरकार दरबारी अद्याप त्याची योग्य ती दखल घेतली गेली नाही.



फ्रंटलाईन
दीपक मोहिते
९०११०५५४१३
९५४५८००६६६

दुसरीकडे सरकार उद्योग समूहाची तळी उचलत भर समुद्रात मातीभराव करून विनाशकारी प्रकल्प उभे करत आहे. या प्रकल्पामुळे समुद्रातील मासेमारीचे क्षेत्र दिवसागणिक कमी होत चालले आहे. समुद्र उद्योगसमुहाच्या घश्यात घालण्याचे जे प्रयत्न सातत्याने होत आहेत. त्यास सरकारची मदत होत असल्यामुळे मच्छिमार समाज सध्या भितीच्या सावटाखाली आला आहे.

काही जंगलातील बेसुमार वृक्षतोड, अतिक्रमणे व ध्वनीप्रदूषण, यामध्ये झालेल्या भरमसाठ वाढीमुळे जंगलातील हिंस्त्र जनावरे आता जंगले सोडून नागरी वसाहतीमध्ये शिरू लागली आहेत. ही हिंस्त्र जनावरे मौजमजा म्हणून नागरी वसाहतीमध्ये फेरफटका मारण्यासाठी जंगलातून बाहेर पडत नाहीत. तर त्यांची ही भटकंती ही खाद्य व पिण्याच्या पाण्याच्या शोधात सुरू झाली आहे.

जंगलातील खाद्य व जलसाठे संपुष्टात आल्यामुळे हा धोका निर्माण झाला आहे. जंगलात सुरू झालेल्या मानवी गजबजाटामुळे जनावरांसाठी आवश्यक असणारी शांतता लोप पावली आहे व आज आपण सारे एका वेगळ्या संकटाला सामोरे जात आहोत.मातीची धूप व जैवविविधतेचा होणारा ऱ्हास अशा दोन कारणामुळे जंगलक्षेत्र आता उतरणीला लागले आहे. रस्ते, प्रचंड नागरीकरण, शहराचा विस्तार, समुद्रातील अतिक्रमणे, खनिज अशा कारणामुळे जंगले नष्ट व्हायला लागली आहेत.

प्रदूषण व तेलसंशोधनाचा हव्यास, अशा तीन महत्वाच्या कारणामुळे समुद्रधनावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणारा मच्छीमार समाज सध्या उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. तेलविहिरीचे वाढते क्षेत्र, समुद्रात होत असलेला प्रचंड मातीभराव, वाढते प्रदूषण तसेच समुद्रकिनारी महाकाय तसेच विनाशकारी प्रकल्प लादण्याचा सरकारचा अट्टाहास, अशा विविध कारणांमुळे भविष्यात मानवाला फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून वसईच्या समुद्रात रिंगण तयार झाले आहे. या रिंगणात एक मासेमारी बोट अडकून पडली होती. तिला वाचवण्यासाठी इतर मच्छीमारांनी आपल्या जीवाची बाजी लावून ती बोट कशीबशी खेचून आणली.

या भागात पाण्याच्या प्रवाहाचे मोठे गोल आकाराचे रिंगण तयार झाले आहे. त्या रिंगणातून मातीच्या रंगाचे पाणी बाहेर फेकले जात आहे. हे रिंगण कसे तयार झाले, याचा शोध घेण्यासाठी सरकारी यंत्रणा सक्रिय झाल्या आहेत, पण महिना उलटल्यानंतरही त्याचा शोध लागलेला नाही.

काही वर्षांपूर्वी मुंबईतील बॅकबे उभारणीसाठी झालेल्या मातीभरावामुळे समुद्राचे पाणी आता समुद्रकिनारी असलेल्या गावाच्या दिशेने सरकू लागले आहे. त्यामुळे अनार्ळा समुद्र किनारी असलेल्या मच्छीमारांच्या राहत्या घरांची दरवर्षी नासधूस होत असते. अशा या जल, जंगल व जमिनीच्या संकटामुळे भविष्यात मानवजात अडचणीत येण्याची शक्यता आहे.

विकास व झोपडपट्टीत राहणाऱ्या गोरगरीब जनतेचे पुनर्वसन करण्याच्या नावाखाली आपले मायबाप सरकार कोट्यवधी रु. किमतीच्या जमिनी उद्योगपतीना देऊ लागले आहे. आज वाढवण बंदर, टेक्स्टाईल पार्क व मुरबे येथे होणारे उद्योगसमुहाचे खाजगी बंदर, त्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनी सरकार साम, दाम, दंड, भेद नितीचा वापर करू लागले आहे. पर्यावरणाचे सारे कायदे व नियम धाब्यावर सरकार जुलूम व जबरदस्ती करू पाहत आहे.

नव्याने होऊ घातलेल्या प्रकल्पात स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन सरकार देत आहे. पण आजवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पात स्थानिक भूमिपुत्रांना डावलून बाहेरच्या लोकांना नोकऱ्या देण्यात आल्या. त्यामुळे लोकांचा सरकारच्या बोलण्यावरून विश्वास पार उडाला आहे. त्यामुळे सरकारने जमिनी संपादन करताना देण्यात येणाऱ्या मोबदल्यात दामदुपट्टीने वाढ केली आहे.

सरकारच्या या डावपेचाला स्थानिक ग्रामस्थ आता बळी पडत आहेत. सरकारचे हे धोरण ग्रामीण भागातील भूमिपुत्रांना भूमिहीन करणारे आहे. पण पैश्याच्या अमिषाला ते बळी पडत आहेत. जल, जमीन व जंगले नष्ट झाल्यास आपण उध्वस्त होऊ याची जाणीव होत असूनही स्थानिक पैश्याच्या आमिषाला बळी पडू लागले आहेत.

ग्लोबल वॉर्मिंगचा फटका जगभरातील अनेक देशांना बसू लागला आहे, त्यामध्ये आपलाही समावेश आहे. गेल्या काही सतत येणाऱ्या वादळाच्या संख्येत सतत वाढ होत आहे. पण आपले सरकार त्याची दखल घ्यायला तयार नाही. तर स्थानिक भूमिपुत्र देखील पैश्याच्या आमिषाला बळी पडू लागले आहेत.

# व्हॅलेंटाईन वीक युवावर्गाचे नैतिक अधःपतन करणारा सप्ताह

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं!' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे.

प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही.

मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही.

काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा?

'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशी तयारी करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत.

'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो.

'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये खचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज' भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात.शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच प्रमुख कारण असावे.

या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते.

या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या 'डेज'चा कमालीचा मनस्ताप होतो.

'रोज डे', 'प्रपोझ डे', 'प्रॉमिस डे', 'किस डे', 'हग डे', 'चॉकोलेट डे' आणि 'व्हॅलेंटाईन डे' यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात.

प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अधःपतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला?

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

■ ■ ■

# चिंच खाल्ल्यामुळे शरीराला काय फायदे होतात?



चिंचेचे नाव ऐकल्यावर तोंडाला पाणी सुटते, मग तुम्ही समोसेबरोबर सर्व्ह केलेल्या मसालेदार चटणीसह आनंद घ्याल किंवा कच्चे खा. त्याची चव प्रत्येकाला आवडते, परंतु चव वाढविण्याच्या क्षमतेव्यतिरिक्त ते एक औषध देखील मानले जाते. ह्याचे नियमित सेवन केल्याने शरीर अनेक आजारांपासून दूर राहू शकते.

आयुर्वेदात चिंचेला आम्ल रस प्रधान फळ मानले जाते. ती चवीला आंबट असली तरी योग्य प्रमाणात सेवन केल्यास शरीरासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. चिंच पचनशक्ती वाढवणारी आहे. जठराग्नी प्रज्वलित करून अन्नाचे पचन नीट करते, त्यामुळे अपचन, गॅस, पोट फुगणे, बद्धकोष्ठता यांसारख्या तक्रारी कमी होतात. विशेषतः जड, तेलकट किंवा मसालेदार अन्न पचवण्यासाठी चिंचेचा वापर फायदेशीर मानला जातो. चिंचेमुळे तोंडाला चव येते आणि भूक वाढते, म्हणूनच आजारातून बरे होत असताना ती उपयोगी ठरते.

चिंच वात आणि कफ दोष कमी करते, मात्र पित्त दोष वाढवू शकते. त्यामुळे पित्त प्रकृतीच्या लोकांनी मर्यादित प्रमाणातच चिंच खावी. चिंचेमध्ये नैसर्गिक अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन उ, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि फायबर असतात. हे घटक शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यास मदत करतात. रक्त शुद्ध करण्यास, सूज कमी करण्यास आणि शरीरातील उष्णता संतुलित ठेवण्यास चिंच उपयुक्त ठरते.

ताप, उलटी, अतिसार यांसारख्या अवस्थेत चिंचेचे पाणी पारंपरिक उपाय म्हणून वापरले जाते. तसेच चिंचेमुळे आतड्यांची हालचाल सुधारते, त्यामुळे पोट साफ राहते. चिंच हृदयाच्या आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. तिच्यातील फायबर व अँटीऑक्सिडंट्स कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करतात, त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठीही चिंच उपयोगी ठरते. चिंचेचा वापर सांधेदुखी, वातविकार, सूज यामध्ये बाह्य आणि अंतर्गत औषध म्हणून केला जातो. चिंचेचा कोमट लेप वेदनादायक सांध्यांवर लावल्यास आराम मिळतो, असे मानले जाते. महिलांमध्ये मासिक पाळीशी संबंधित त्रास, थकवा आणि अशक्तपणा कमी करण्यासाठीही चिंच फायदेशीर ठरते.

चिंच अति प्रमाणात खाल्ल्यास आम्लपित्त, छातीत जळजळ, दातांची झीज किंवा घसा दुखणे यांसारखे त्रास होऊ शकतात. चिंच ही पचन सुधारणारी, दोष संतुलित करणारी आणि शरीराला ताजेतवाने ठेवणारी देणगी आहे.

चिंचेमध्ये पेक्टिन आणि श्लेष्मल त्वचेसारखे स्टार्च नसलेले पॉलिसेकेराइड्स असतात, जे मल मोठे करून, आतड्यांच्या हालचाली गुळगुळीत करून आणि दीर्घकाळापासून बद्धकोष्ठता दूर करून सहज मार्ग काढण्यास मदत करतात. चिंचेचा आंबटपणा टार्टरिक आम्ल आणि इतर सेंद्रिय आम्लांमुळे होतो. हे ॲसिड पाचक रस सक्रिय करतात आणि पोटाला अन्न तोडण्यास मदत करतात. चिंचेच्या खाल्ल्याने लाळ वाढते, ज्यामुळे कार्बोहायड्रेट्स खराब होण्यास सुरवात होते, यकृतातून पित्त बाहेर पडते, जे चरबीच्या पचनासाठी आवश्यक आहे. ते खाल्ल्याने अन्न सहज पचते.

■ ■ ■

अशोकायन
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## मोबाईल गेमची घातकता

पालकांनी निर्बंध घातले
म्हणून तीन बहिणींनी
मजल्यावरून उडया खात
जीवन केले भाऊ बर्बाद
शहराचे नाव गाजियाबाद . .

पालकांनो आता तरी रहा दक्ष
सदोदीत ठेवा लक्ष
व्यसनाधिन झाली बालके
तर ठरतील मोबाईलचे भक्ष .

मनी राहील ना हुरहूर
पालकत्वात राहीली कसूर
मन होईल हताश
जीवन होईल भकास ..!

# विदर्भ बनेल ऊर्जा, उद्योग आणि रोजगाराची नवी राजधानी : जीत अदाणी



**नागपूर, ६ फेब्रुवारी :** विदर्भ आता फक्त शक्यतांचा प्रदेश राहिलेला नाही, तर भारताच्या दीर्घकालीन विकासासाठी नवीन केंद्र बनण्यासाठी पूर्णपणे तयार आहे. अदाणी ग्रुपचे संचालक जीत अदाणी यांनी ॲडव्हांटेज विदर्भ २०२६ कार्यक्रमात बोलताना सांगितले, मजबूत नेतृत्व, आधुनिक पायाभूत सुविधा आणि उद्योगसरकार यांचा सहयोग यामुळे विदर्भ आपल्या ऐतिहासिक वारशाचे रूपांतर आर्थिक आणि औद्योगिक सामर्थ्यात करत आहे. जीत अदाणी म्हणाले, विदर्भ हे नावच त्याची ओळख आणि सामर्थ्य दाखवते. हा प्रदेश प्राचीन काळापासून ज्ञान, संस्कृती आणि धैर्याचा केंद्र राहिला आहे. नागपूर, जे कधी मध्य प्रांतांची राजधानी होती, आज देशाच्या भौगोलिक केंद्रावर असून लॉजिस्टिक्स, ऊर्जा, विमान वाहतूक आणि तंत्रज्ञानाचा एक उदयोन्मुख केंद्र बनला आहे.त्यांनी असेही सांगितले की, विदर्भाचे हे परिवर्तन अचानक झालेले नाहीत, तर ते अनेक वर्षांच्या धोरणात्मक विचारसरणी आणि नेतृत्वाचे परिणाम आहेत. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितिन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले, आणि म्हटले की पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी आणि संतुलित प्रादेशिक विकासावर त्यांचे लक्ष केंद्रित केल्याने विदर्भ गुंतवणुकीसाठी आकर्षक बनला आहे. जीत अदाणी म्हणाले, आज विदर्भ फक्त त्याच्या क्षमतेसाठीच नाही तर त्याच्या प्रगतीसाठी ओळखला जातो.

अदानी ग्रुपच्या भूमिकेबद्दल बोलताना, जीत अदानी यांनी स्पष्ट केले की, अदाणी ग्रुपची विदर्भमधील उपस्थिती फक्त व्यवहारासाठी नाही, तर ही दीर्घकालीन आणि पिढ्यान्पिढ्या चालणारी वचनबद्धता आहे. तिरोड़ा येथील ३,३०० मेगावाट सुपरक्रिटिकल थर्मल पॉवर प्लांट आणि बुटीबोरी येथील ६०० मेगावाट प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनाने महाराष्ट्राची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत झाली आहे. २५ वर्षांच्या करारामुळे, सौर आणि थर्मल ऊर्जेच्या संयोजनातून ६,६०० मेगावाट विश्वसनीय वीज उपलब्ध होत आहे, जो उद्योग, शहर आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

विदर्भाच्या औद्योगिक भविष्याला आकार देणाऱ्या प्रकल्पांमध्ये, त्यांनी कळमेश्वर मधील लिंगा येथील प्रस्तावित ७०,००० कोटी रुपयांच्या इंटीग्रेटेड कोल गॅसिफिकेशन आणि डाउनस्ट्रीम डेरिव्हेटिव्ह्ज कॉम्प्लेक्सला सर्वात महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे सांगितले. या प्रकल्पामुळे ३०,००० थेट रोजगार निर्माण होतील आणि नागपूरला स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत रासायनिक उद्योगांसाठी जागतिक नकाशावर स्थान मिळेल. जीत अदानी म्हणाले की, हा प्रकल्प आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक मजबूत पाऊल आहे. त्यांनी गोंडखैरी भूमिगत खाण प्रकल्पाचे जबाबदार आणि पर्यावरणपूरक खाणकामाचे उदाहरण म्हणून वर्णन केले, जिथे किमान जमिनीचा वापर, शून्य विस्थापन आणि जलसंवर्धनाला प्राधान्य दिले जाते. बोरखेडी येथे ७५ एकर आयसीडी आणि महाराष्ट्रातील सीमा तपासणी नाक्यांच्या अधिग्रहणामुळे विदर्भ एक मजबूत लॉजिस्टिक्स गेटवे बनत आहे. मिहान येथील विमान एमआरओ सुविधेच्या विस्तारामुळे नागपूर वेगाने आंतरराष्ट्रीय विमान देखभाल केंद्र म्हणून उदयास येत आहे. सामाजिक विकासावर भर देताना त्यांनी सांगितले, अदानी फाउंडेशन विदर्भात आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, स्वच्छ ऊर्जा आणि क्रीडा क्षेत्रात सक्रियपणे काम करत आहे. विकास तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो जेव्हा तो समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचतो.

## आर्थिक वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाही मध्ये मोबिक्विक चा पीएटी नफ्यात

**मुंबई, ६ फेब्रुवारी :** वन मोबिक्विक सिस्टीम्स लिमिटेड (मोबिक्विक) (एनएसई: मोबिक्विक / बीएसई: ५४४३०५), भारतातील सर्वात मोठे डिजिटल वॉलेट २, यांनी आज ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीचे (स्टँडअलोन व कन्सॉलिडेटेड) आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने नफ्यातील तिमाही नोंदवली असून, पेमेंट्स आणि फायनान्शियल सर्व्हिसेस व्यवसायांतील मजबूत अंमलबजावणीमुळे ही कामगिरी साध्य झाली आहे. मोबिक्विक नफ्यात संक्रमण करत असताना आणि आपल्या प्लॅटफॉर्मचा विस्तार सातत्याने वाढवत असताना, भारतभर डिजिटल आर्थिक प्रवेश सक्षम करण्यात आपली भूमिका अधिक बळकट करत असल्याने, हा टप्पा कंपनीसाठी महत्त्वाचा टर्निंग पॉईंट ठरतो.

तिमाही ३ आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कंपनीने कडक खर्च नियंत्रण आणि सुदृढ मार्जिन विस्ताराच्या जोरावर मजबूत ऑपरेशनल कामगिरी नोंदवली. ऑपरेशनल शिस्तीमुळे वर्ष-दर-वर्ष ६ दशलक्षांचा ईबीआयटीडीए टर्नअराउंड साध्य झाला, ज्यामुळे निव्वळ (पीएटी) नफ्या पर्यंत पोहोचण्यात यश मिळाले. या सर्व आकडेवारीतील सुधारणा कर्ज व्यवसायातील पूर्ण सुधारणा दर्शवते. नफ्यातील स्थिती दृढ झाल्यामुळे, कंपनी आता आपल्या डिजिटल फायनान्शियल सर्व्हिसेस पोर्टफोलिओत नियंत्रित आणि शाश्वत पद्धतीने वाढ वेगाने पुढे नेण्यासाठी सक्षम आहे.

कंपनीच्या कामगिरीवर भाष्य करताना, मोबीक्विक च्या कार्यकारी संचालक, सह-संस्थापकआणि सीएफओ उपासना टाकू म्हणाल्या, आम्हाला नफ्यातील तिमाही जाहीर करताना आनंद होत आहे, जी आमच्या व्यवसायांमध्ये शिस्तबद्ध अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण खर्च सुधारणा दर्शवते. ऑपरेशनल कार्यक्षमतेवर आणि विचारपूर्वक विस्तारावर लक्ष केंद्रित केल्यामुळे, आम्ही नफ्यात पोहोचताना वाढीची गती टिकवून ठेवू शकलो. आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या सहामाही मध्ये नफ्यात पोहोचण्याबाबत आम्हाला खात्री होती आणि आणि आम्ही त्या वचनाचे यशस्वीपणे पालन केले याचा आम्हाला अभिमान आहे. पुढेही, आम्ही आमच्या प्लॅटफॉर्मचा जबाबदारीने विस्तार करण्यासाठी आणि शेअरहोल्डर्ससाठी दीर्घकालीन मूल्य निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहणार आहोत

## स्कोडा कायलक ने ५०,००० विक्रमी टप्प्या गाठला एका वर्षात



**नागपूर, ६ फेब्रुवारी :** २०२५ मध्ये विक्रीचे सर्वात यशस्वी वर्ष नोंदवल्यानंतर आणि नवीन कुशाक सादर केल्यानंतर, स्कोडा ऑटो इंडिया त्यांच्या वाढत्या उत्पादन श्रेणीसह त्यांची प्रगती कायम ठेवत आहे. ब्रँडने त्यांची सर्वाधिक विकली जाणारी कार, कायलक च्या व्हेरिएंट्सची श्रेणी विस्तारून आणि ग्राहकांना जास्त व्हेरिएंट्स, भरपूर पर्याय व अधिक मूल्य प्रदान करून, भारतीय रस्त्यांवर युरोपियन तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध करून देण्याच्या आपल्या धोरणाला पुढे नेले आहे.

कायलकच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त भाष्य करताना, स्कोडा ऑटो इंडिया चे ब्रँड डायरेक्टर आशीष गुप्ता, म्हणाले, कायलक म्हणजे भारताप्रती असलेल्या आमच्या दीर्घकालीन वचनबद्धतेचा एक भक्कम पुरावा आहे आणि यामुळे आम्ही बाजारातील सर्वात स्पर्धात्मक सेगमेंटमध्ये प्रवेश केला. ५०,००० विक्रीचा टप्पा पार करणे ही खरोखरच एक आनंद देणारी बाब असून स्कोडा ब्रँडवरील वाढत्या विश्वासाचे प्रतीक आहे. ही गती कायम ठेवण्यासाठी, आम्ही ग्राहकांच्या सूचनांनुसार सुधारणा करून कायलक लाइन-अपचविस्तार करून, कायलक ला त्याच्या सेगमेंटमधील रिअल ऑटोमॅटिक ट्रान्समिशन असलेली सर्वात सहज उपलब्ध होणारी गाडी बनवत आहोत. हे अपग्रेड्स आजच्या ग्राहकांसाठी सर्वात महत्त्वाच्या असलेल्या वैशिष्ट्यांना, सर्व व्हेरिएंट्समध्ये, सर्वांसाठी उपलब्ध करून देतात. अधिक व्यापक आणि सुव्यवस्थित श्रेणी, आणि या वर्षाच्या उत्तरार्धात नियोजित असलेल्या अधिक रोमांचक नवीन गोष्टींसह, कायलक भारतीय रस्त्यांसाठी युरोपियन तंत्रज्ञान, उच्च मूल्य आणि उत्कृष्ट ड्रायव्हिंग अनुभव देण्याच्या आमच्या वचनबद्धतेला सातत्याने प्रतिबिंबीत करत आहे.

## शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये गुंतागुंतीच्या यकृत शस्त्रक्रियेनंतर अमरावती येथील रुग्णाला मिळाले नवजीवन



अमरावती जिल्ह्यातील ५५ वर्षीय पुरुष रुग्णाला पोटदुखी आणि सतत अशक्तपणा जाणवण्याच्या तक्रारी होत्या. त्यांच्यावर नागपूर येथील वानाडोंगरी येथील १०२० बेडच्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) येथे यशस्वी उपचार करण्यात आले. रुग्णाला शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या शस्त्रक्रिया विभागात दाखल करण्यात आले होते. सखोल वैद्यकीय तपासणी आणि प्रगत इमेजिंगमध्ये यकृताच्या डाव्या भागात मोठी गाठ आढळून आली, जी कर्करोगाची असण्याची शक्यता होती. तज्ज्ञ डॉक्टरांच्या संयुक्त चर्चेनंतर गाठ पूर्णपणे काढण्यासाठी आणि भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी यकृताच्या डाव्या भागाची मोठी शस्त्रक्रिया (लेफ्ट हेपॅटेक्टॉमी) करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना डीएमआयएचईआर (डीयू) नागपूर ऑफ कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. अनुप मरार म्हणाले, शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये पहिल्यांदाच यशस्वीपणे करण्यात आलेली डाव्या यकृताची शस्त्रक्रिया ही आमच्या शस्त्रक्रिया टीम्सची वाढती कौशल्यपूर्ण तयारी आणि प्रगत, उच्च दर्जाच्या उपचार सेवा रुग्णांच्या जवळच उपलब्ध करून देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. हा महत्त्वाचा टप्पा शालिनीताई मेघे हॉस्पिटलला गुंतागुंतीच्या आणि सुपर-स्पेशालिटी शस्त्रक्रियांसाठी उत्कृष्ट केंद्र म्हणून विकसित करण्याच्या आमच्या दृष्टीकोनाला अधिक बळ देतो. सरकारी योजनांतर्गत अत्यल्प किंवा विनाशुल्क, रुग्णांच्या सुरक्षिततेसह दर्जेदार उपचार देणे हे आमचे ध्येय आहे.

रुग्णाच्या नातेवाईकांनी शालिनीताई मेघे हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरचे मनापासून आभार मानले. एवढी मोठी आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करून दिल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आमच्या कुटुंबासाठी ही मदत देवदूतासारखी ठरली. डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी आम्हाला आपुलकीने वागवले आणि आमच्या प्रिय व्यक्तीला नवजीवन दिले, असे एका नातेवाईकाने सांगितले.

हे यश शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या प्रगत यकृत शस्त्रक्रिया क्षेत्रातील सातत्यपूर्ण प्रगती दर्शवते तसेच, उत्कृष्ट वैद्यकीय सेवा, संघभावना आणि रुग्णकेंद्रित उपचारांवरील रुग्णालयाची ठाम बांधिलकी अधोरेखित करते.

## घूसखोर पंडत चित्रपटाबद्दल नीरज पांडे यांचे अधिकृत निवेदन

**नागपूर, ६ फेब्रुवारी :** आमचा चित्रपट हा पूर्णपणे काल्पनिक पोलिस ड्रामा आहे. यात पंडत हा शब्द फक्त एका काल्पनिक पात्रासाठी वापरले गेले आहे. ही कथा एका व्यक्तीच्या कृती आणि निर्णयांवर आधारित आहे. याचा कोणत्याही जाती, धर्म किंवा समुदायाशी संबंध नाही, तसेच कोणावरही टीका करण्याचा उद्देश नाही.

एक चित्रपट दिग्दर्शक म्हणून मी माझ्या कामाकडे मोठ्या जबाबदारीने पाहतो आणि नेहमी विचारपूर्वक आणि आदराने कथा मांडतो. हा चित्रपटही माझ्या आधीच्या चित्रपटांप्रमाणेच प्रामाणिक हेतूने आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठीच तयार केला गेला आहे. चित्रपटाच्या शीर्षकामुळे काही प्रेक्षकांच्या भावना दुखावल्या गेल्या असतील, याची आम्हाला जाणीव आहे आणि आम्ही त्यांच्या भावनांचा मनापासून आदर करतो. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन, सध्या आम्ही चित्रपटाशी संबंधित सर्व प्रचार साहित्य हटवण्याचा निर्णय घेतला आहे. आमच्या मते, हा चित्रपट पूर्ण पाहून आणि त्याची कथा समजून घेऊनच त्यावर मत द्यावे, फक्त काही भाग पाहून निष्कर्ष काढू नये. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांसमोर सादर करण्यास मी उत्सुक आहे.

## आरएसएसच्या शताब्दीनिमित्त शतक : संघाचे १०० वर्ष या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित



**मुंबई, ६ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेच्या १०० वर्षांच्या निमित्ताने तयार करण्यात आलेल्या शतक: संघाचे १०० वर्ष या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला. संघाची शंभर वर्षांची वाटचाल, त्यांची विचारधारा आणि सामाजिक योगदान असलेला हा चित्रपट आहे.

२०२५ मध्ये आरएसएसने आपल्या स्थापनेची शताब्दी पूर्ण केली. या ऐतिहासिक टप्प्याच्या पार्श्वभूमीवर शतक हा चित्रपट साकारण्यात आला आहे. देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर खोलवर प्रभाव टाकणाऱ्या संघाच्या दीर्घ प्रवासाची कथा हा चित्रपट मांडत आहे. अलीकडेच दिल्लीतील आरएसएसच्या केशव कुंज कार्यालयात या चित्रपटातील भगवा है अपनी पहचान या गीताचे लोकार्पण सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. हे गीत प्रसिद्ध गायक सुखविंदर सिंह यांनी गायले आहे. देशभक्तीने ओतप्रोत भरलेले हे गीत चित्रपटाची भावना आणि मूलभूत विचार प्रभावीपणे व्यक्त करते.

टीझरमधून पहायला मिळते की, हा चित्रपट संघाबाबत अनेक वर्षांपासून असलेल्या गैरसमजांवर आणि भ्रमांवरही प्रकाश टाकतो. केवळ चर्चा किंवा वादांपुरते मर्यादित न राहता, इतिहास, विचारधारा आणि संघटनात्मक विकास योग्य संदर्भासह मांडणे हा चित्रपटाचा उद्देश आहे. स्वातंत्र्यलढ्यातील आरएसएसचे योगदान, विविध काळात लादलेली बंदी आणि आणीबाणी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांची झलकही यात पाहायला मिळते. चित्रपटाचे दिग्दर्शक आशीष मल्ल म्हणाले, हा चित्रपट माझ्यासाठी एका वैयक्तिक प्रवासासारखा आहे. संशोधनादरम्यान संघाशी संबंधित असे अनेक पैलू समोर आले, ज्यांवर सहसा चर्चा होत नाही. समाजात पसरलेल्या गैरसमजांना प्रामाणिकपणे समोर आणणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट होते.

चित्रपटाचे निर्माते वीर कपूर यांनी सांगितले, हा चित्रपट पुस्तके, आणि उपलब्ध साहित्याच्या आधारे तयार करण्यात आला आहे. संघाच्या वैचारिक परंपरेला एकत्र गुंफून ती सिनेमाई भाषेत मांडण्याचा आमचा प्रयत्न आहे. ते १९५० या काळात सुरू झालेल्या अनेक चळवळींपैकी संघ ही एकमेव संघटना आहे जी अखंडपणे पुढे जात राहिली. हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे. ना रुके, ना थके, ना झुके ही चित्रपटाची टॅगलाईन याच भावनेचे प्रतीक आहे.

## ओप्पो रेनो१५सी द्वारे रेनो१५ सिरीजचा विस्तार



**नवी दिल्ली, ६ फेब्रुवारी :** ओप्पो इंडिया ओप्पो रेनो१५सी लाँचद्वारे त्याच्या रेनो१५ सिरीजचा विस्तार करत आहे. हा स्मार्टफोन प्रवासी, क्रिएटर्स आणि फोटोग्राफी उत्साही अशा विविध प्रकारच्या लोकांसाठी रेनोचा मूळ अनुभव अधिक ॲक्सेसिबल करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. रिफाइन्ड डिझाइन, लॉन्ग-लास्टिंग एंड्युरन्स आणि इंटेलिजंट एआय फीचर्स यांना एकत्रित करत रेनो१५सी हा रेनो सिरीजच्या मुख्य क्षमतांना अधिक ॲक्सेसिबल पॅकेजमध्ये डिलिव्हर करतो. रेनो१५सी हा भारतात ५ फेब्रुवारी २०२६ पासून आफ्टरग्लो पिंक आणि ट्वायलाइट ब्लू या दोन रंगांमध्ये खरेदीसाठी उपलब्ध असेल.

रेनो१५सी मध्ये पावरफुल ७०००एमएएच बॅटरी असून ८० वॅट सुपरवूओक फास्ट चार्जिंग सपोर्ट दिला आहे, ज्यासोबत इमर्सिव्ह अमोलेड डिस्प्ले, रिलायबल परफॉर्मन्स, मजबूत ड्युरॅबिलिटी तसेच कलरओएस १६ देण्यात आले आहे, ज्यामुळे सतत प्रवास करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी हा एक दरदिवशीचा साथीदार ठरतो.

## गणेश कार्तिकेय मध्ये भगवान शिवाची भूमिका साकारताना त्यांना संयम आणि भावनिक सामर्थ्य आत्मसात करण्यास मदत झाली : अविनेश रेखी



**मुंबई, ६ फेब्रुवारी :** संपूर्ण देश महाशिवरात्रीच्या पावन उत्सवाची तयारी करत असताना, सोनी सबवरील गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय या मालिकेत भगवान शिवाची प्रभावी आणि करुणामय भूमिका साकारणारे अभिनेता अविनेश रेखी यांनी या उत्सवाचा गहन अर्थ आणि या भूमिकेने त्यांच्यावर केलेला खोल परिणाम यावर चिंतन केले.

महाशिवरात्री हा उत्सव अंतर्गत जागृती, संतुलन आणि उच्च चेतनेसमोर समर्पणाचे प्रतीक आहे. यंदा हा उत्सव अविनेश यांच्यासाठी विशेष ठरला आहे. भगवान शिवाची भूमिका साकारताना त्यांचा प्रवास आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध झाला असून, त्यांना सामर्थ्य, करुणा आणि जबाबदारी नव्या दृष्टिकोनातून अनुभवता आली आहे.

महाशिवरात्रीच्या आध्यात्मिक महत्त्वाबद्दल बोलताना अविनेश म्हणाले, महाशिवरात्री हा फक्त उत्सव नाही, तर थांबून विचार करण्याचा आणि आपल्या अंतरात्म्याशी पुन्हा जोडून घेण्याचा एक संदेश आहे. गणेश कार्तिकेय मध्ये भगवान शिवाची भूमिका साकारणे माझ्यासाठी अत्यंत नम्र करणारा आणि परिवर्तनकारी अनुभव ठरला आहे. भगवान शिव हे केवळ सामर्थ्याचे देव नाहीत, तर अपार शांतता, करुणा आणि संतुलनाचे प्रतीक आहेत. या पात्रासोबत दररोज जगताना मला स्थिरतेचे आणि श्रद्धेचे महत्त्व समजले, विशेषतः आजच्या वेगवान जगात.

ते पुढे म्हणाले की या उत्सवामुळे मालिकेतील त्यांचा अनुभव अधिक खास झाला आहे. ते म्हणाले, गणेश कार्तिकेय मधून आम्ही भगवान शिवाला केवळ दुष्टांचा संहारक म्हणून नव्हे, तर आपल्या पुत्र भगवान गणेश आणि भगवान कार्तिकेय यांचा जिव्हाळ्याचा पिता आणि मार्गदर्शक शक्ती म्हणूनही दाखवत आहोत. भगवान शिवाची भूमिका साकारताना मला संयम, नम्रता आणि भावनिक सामर्थ्य आत्मसात करण्याची शिकवण मिळाली. या पवित्र महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी प्रार्थना करतो की भगवान शिव सर्वांना आशीर्वाद देवोत आणि ही रात्र प्रत्येकाच्या जीवनात परिवर्तन आणि सकारात्मकता घेऊन येवो.

## शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| ५६० | १५६ | १४० | ५६७ | १४९ | १५९ | १७८ | ४५० |
| ३८० | ३९० | ६९० | ४४० | २४८ | ३५७ | ३५८ | ३७९ |
| २९० | ४८० | ४५६ | ३६९ | ३४७ | ४४७ | २७७ | २७० |

| कल्याण जोडी | मुंबई जोडी |
|---|---|
| १० - २० - ५३ - ८३ | ४३ - ५३ - ६१ - ९१ |
| १४ - २४ - ५७ - ८७ | ४७ - ५७ - ६८ - ९८ |
| १६ - २६ - ५९ - ८९ | ४० - ५० - ६२ - ९२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ७ फेब्रुवारी २०२६

## शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६

**सर्व बाजार साठी**

३१ - ६१ - ७२ - ०२
३५ - ६५ - ७८ - ०८
३९ - ६९ - ७४ - ०४

४९० - १२३ - २५० - २३५
२२९ - २५९ - ३६८ - ३७०
३०० - ४५७ - १३३ - ४६०

सर्व बाजारासाठी

| गुरू. ते शनि. ओपन डे | | | | | | गुरू. ते शनि. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५७ | | १५८ | | ५०० | | १३५ | | २३५ | | १५५ | |
| ४४५ | ३ | ३४७ | ४ | ६९० | ५ | ३६० | ९ | ४६० | ० | ५८८ | १ |
| ३५५ | | ७८९ | | ७८० | | ५६८ | | ११८ | | ३९९ | |

| गुरू. ते शनि. क्लोज डे | | | | | | गुरू. ते शनि. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२७ | | २२८ | | १३४ | | ४६७ | | ७९० | | २४९ | |
| ६६९ | १ | ३३६ | २ | ३५० | ८ | ८९० | ७ | ११४ | ६ | ४५६ | ५ |
| ५७९ | | ४९९ | | ५६७ | | २५० | | २४० | | ३४८ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
१ २ ३ ९ ०

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आर्थिकदृष्ट्या हा दिवस सामान्य असेल; कोणतीही मोठी गुंतवणूक करण्यापूर्वी अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या. भावंडांशी तुमचे नाते सुधारेल. तुम्ही प्रवास करण्याचा विचार करत असाल, तर सामान तपासून घ्या.

**वृषभ :** आज रागावर नियंत्रण ठेवा, अन्यथा त्यांचे काम बिघडू शकते. कार्यालयातील विरोधक तुमच्याविरुद्ध कट रचू शकतात, त्यामुळे सतर्क रहा. आर्थिक ताण येऊ शकतो, त्यामुळे अनावश्यक खर्च टाळणे श्रेयस्कर.

**मिथुन :** आजचा दिवस लाभदायक आणि प्रगतीशील असेल. सर्जनशील उपक्रमांमध्ये तुमची आवड वाढेल आणि तुमची प्रतिभा दाखवण्याची संधी मिळेल. आर्थिकदृष्ट्या तुम्हाला सुरक्षित वाटेल.

**कर्क :** नवीन गुंतवणुकीसाठी हा दिवस अनुकूल नाही, त्यामुळे सावधगिरी बाळगा. तुम्ही कुटुंबासोबत हसू आणि मजा करताना वेळ घालवाल, ज्यामुळे तुम्हाला मानसिक ताजेपणा मिळेल.

**सिंह :** कुटुंबात शांतता टिकवण्यासाठी मौन बाळगणे चांगले. गाडी चालवताना सावधगिरी बाळगा आणि रस्त्यावरील नियमांचे पालन करा. मन शांत ठेवण्यासाठी आध्यात्मिक पुस्तक वाचणे फायदेशीर ठरेल.

**कन्या :** जुने थकलेले पैसे परत मिळू शकतात. तुमच्या जोडीदाराकडून भरपूर पाठबळ मिळेल, ज्यामुळे तुम्ही मानसिकदृष्ट्या बळकट व्हाल. तुम्ही मित्रांसोबत मनोरंजनावर खर्च करू शकता.

**तुळ :** जीवनात सकारात्मक परिणाम घेऊन येणारा आजचा दिवस आहे. आजचा दिवस तुमच्यासाठी अत्यंत अनुकूल ठरणार आहे आणि नशीब तुमचे साथ देईल.

**वृश्चिक :** जर तुम्हाला मित्राची मदत हवी असेल, तर विनंती करण्यास संकोच करू नका. तुमचे आरोग्य ठीक राहील, परंतु हंगामी आजारांपासून सावध राहणे आवश्यक आहे. अनोळखी लोकांवर विश्वास ठेवणे टाळावे.


**धनु :** वैवाहिक जीवनात आनंद आणि शांती राहील मालमत्ता-संबंधित तुमच्या , आणि मुलांच्या भविष्यासंबंधी घेतलेले निर्णय योग्य ठरतील. तुम्हाला ऊर्जावान वाटेल. पोटदुखी टाळण्यासाठी हलका आहार घेणे आवश्यक आहे.

**मकर :** आज तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत कुठेतरी जाण्याची योजना आखाल. कंटाळा टाळण्यासाठी दैनंदिन दिनचर्येत थोडी विविधता आणा. आर्थिकदृष्ट्या आपल्याला बचतीकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

**कुंभ :** तुमची सामाजिक प्रतिष्ठा वाढेल आणि तुम्ही सर्वांचे लक्ष वेधून घेणारे ठराल. तुमचे आरोग्य उत्कृष्ट राहील. तुमच्या पालकांच्या आशीर्वादामुळे आज तुमचे खूप काळापासून अडकलेले एक काम पूर्ण होणार आहे.

**मीन :** आजचा दिवस सावधगिरीचा आहे. व्यवसाय मालकांना आज त्यांच्या व्यवहारात अत्यंत सतर्क राहावे लागेल. तुम्ही कोणावरही आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. आत्मविश्वास कायम ठेवा.

## शब्दकोडे क्रमांक २३४६



**आडवे शब्द :-**
१) छळ, त्रास
४) विशेष
६) वायु
१०) यार, प्रियकर
११) खाण्याचा पाव
१३) धमनी
१४) कर्णेंद्रिय
१५) सोने
१७) कर्ज देणारा
१९) लायक नसलेला
२१) वार्ता
२३) बाजार
२५) लवंगी फटाक्याची माळ
२६) कोंकणामधील स्वरुपानंद स्वामींच्या समाधीचे गाव
२८) पांथस्थ, प्रवासी
३०) लहान
३१) पाच दिवसाची क्रिकेट मॅच
३४) वधूची सासू
३६) काणी, तिरळी
३९) काढलेली सुट्टी
४०) प्रहार, घाव
४१) एकमताने केलेला विचार
४४) पुन्हा
४५) आकाश
४७) अटीची भाषा
४८) गाव, शहर
५०) बांबू
५२) पाणी
५३) कवी
५५) मालक
५६) पायदळाचा शिपाई
५८) आच्छादन, आवरण
५९) पाय
६०) कणीदार पीठ
६२) मत्सर
६३) यथाशास्त्र
६५) नाणी पारखणारा
६६) संकट, त्रासदायक मनुष्य
६७) मोठी बहीण
६८) साठ मिनिटे.

**उभे शब्द :-**
१) नशा आणणारा एक पदार्थ
२) चकचकीत
३) नरमच्या विरुद्ध
४) राज्य, एक पंथ
५) मोठा तलाव
७) बारावी रास
८) जिव्हा
९) आई वडील
१२) निंदा, दोष दर्शन
१४) एक प्रश्नार्थक शब्द
१६) पुरुषजात
१८) मोटेद्वारे काढलेले पाणी
२०) शरम
२१) वाळा
२२) ऐनवेळी कच खाणारा
२४) रेशीमाचे जाडसर कापड
२६) फलक, टोपली
२७) विषमच्या विरुद्ध
२९) कापड मापण्याचा १४ तसूंचा गज
३२) चंद्र
३३) नृत्य
३५) अनुमती
३७) खाटीक
३८) मूल्य, दर
४०) अजगर
४२) मवाळ धोरण
४३) सुतळीचे कापड
४४) त्रयस्थ, तिऱ्हाईत
४५) मांडी, आकडा
४६) रात्री भटकणारा
४९) विधवा
५१) झोंबणारे, खरबरीत
५४) जिनसांची यादी
५६) प्रवाशांना पाणी पिण्याची केलेली सोय
५७) कर (टॅक्स) देणारा
६१) उत्तराधिकारी
६२) हट्ट
६४) वर्ष.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर





# बालांगण



## जग ऑटोमेटेड कार्सचं

**रंजक विज्ञान**

आजकाल आपण ऐकतो की काही गाड्या स्वतःहून चालतात. या गाड्यांमध्ये ड्रायव्हर नसतो. अशा गाड्यांना ऑटोमेटेड कार्स म्हणतात. म्हणजेच गाडी चालवण्यासाठी नेहमी माणसाने स्वतः स्टीअरिंग धरायलाच हवे, असे नाही. ही गोष्ट जादूसारखी वाटते खरी, पण यामागे विज्ञान आणि संगणक यांचा मोठा वाटा आहे.

या प्रकारच्या कार्स आजूबाजूचे जग पाहू आणि समजू शकतात. त्यासाठी गाडीवर कॅमेरे, सेन्सर आणि अंतर मोजणारी उपकरणे बसवलेली असतात. ही उपकरणे रस्ता, सिग्नल, समोरची वाहने, माणसे, प्राणी आणि अडथळे ओळखतात. ही सगळी माहिती गाडीतील संगणकाकडे जाते. तो संगणक फार वेगाने ठरवतो की गाडी थांबवायची, हळू चालवायची की वळण घ्यायचे.

टेस्ला ही अशी गाडी बनवणारी एक प्रसिद्ध कंपनी आहे. टेस्लाची कार रस्त्यावर चालताना सतत निरीक्षण करते. समोर गाडी आली तर अंतर ठेवते. सिग्नल लाल असेल तर थांबते. समोरचा रस्ता मोकळा असेल तर पुढे जाते. चालक गाडीत असतोच. पण अनेक वेळा गाडी स्वतः निर्णय घेते. अर्थात आत बसलेल्या माणसाचे लक्ष रस्त्यावर असणे महत्त्वाचे असते.

फक्त टेस्लाच नाही, तर अजूनही अनेक कंपन्या अशा गाड्या बनवत आहेत. बायडू अपोलो गो ही चीनमधली कंपनी स्वतंत्रपणे रस्त्यावर रोबोटॅक्सी चालवते आहे. या कंपनीच्या गाड्या अनेक शहरांमध्ये ऊबरसारख्या सेवा देत आहेत. याशिवाय काही कंपन्या स्वतः चालणाऱ्या टॅक्सी तयार करत आहेत. काही गाड्या सामान पोहोचवण्यासाठी वापरल्या जात आहेत. मोठ्या कार कंपन्याही हळूहळू अशा प्रकारचे तंत्रज्ञान आपल्या गाड्यांमध्ये बसवत आहेत.

भविष्यात या कार्स अजून हुशार होतील. त्या पाऊस, धुके किंवा अंधारातही नीट चालतील, अपघात टाळतील आणि रहदारीचे धोके कमी करतील. तरीसुद्धा रस्ता खरा असतो आणि चूक झाली तर परिणाम गंभीर असू शकतात. म्हणूनच तंत्रज्ञान कितीही आधुनिक आणि प्रगत असले तरी जबाबदारी आणि सावधपणा माणसाने ठेवायला हवाच.

## बहुपयोगी तांबे

**तांबे हे एक महत्त्वाचे खनिज आहे. ते निसर्गात म्हणजेच जमिनीत आणि दगडांमध्ये सापडते. तांब्याचा रंग लालसर तपकिरी असतो. ते सहज वाकवता येते. म्हणूनच माणसांनी खूप वर्षांपूर्वीपासून तांब्याचा वापर सुरु केला. तांबे टिकाऊ असते. ते गंजत नाही. धातूच्या या गुणांमुळे ते उपयोगी मानले जाते.**



**माहिती खनिजांची**

तांबे जगाच्या अनेक भागात सापडते. भारतात तांबे प्रामुख्याने राजस्थान, झारखंड आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये आढळते. राजस्थानमधील खेतडी परिसर, झारखंडमधील सिंहभूम भाग आणि मध्य प्रदेशातील मलाजखंड हे तांब्याच्या खाणींसाठी प्रसिद्ध भाग आहेत. इतर देशांत चिली, पेरू, चीन आणि अमेरिका येथे मोठ्या प्रमाणावर तांबे मिळते.

जमिनीत सापडणारे तांबे थेट वापरता येत नाही. ते खडकांमध्ये मिसळलेले असते. त्यामुळे आधी खाणींतून खडक बाहेर काढले जातात. हे खडक लहान तुकड्यांत फोडून त्यातील तांबे वेगळे केले जाते. नंतर ते प्रचंड उष्णतेवर तापवून शुद्ध केले जाते. या प्रक्रियेत माती, दगड आणि इतर अशुद्ध पदार्थ बाजूला होतात आणि शुद्ध तांबे मिळते. तांबे अधिक शुद्ध व्हावे यासाठी काही ठिकाणी वीजेचा वापर केला जातो.

शुद्ध तांबे अनेक कामांसाठी वापरले जाते. वीज वाहून नेण्याची क्षमता तांब्यात असते. त्यामुळे घरातील वीजवाहिन्या तांब्यापासून बनवल्या जातात. मोबाईल, टीव्ही, संगणक आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये तांबे वापरले जाते. पाणी वाहण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नळांमध्येही तांब्याचा वापर होतो. तांब्याची भांडीही बनवली जातात. त्यातील काही विशिष्ट गुणधर्मामुळे तांब्याच्या भांड्यात पाणी ठेवलं तर ते काही प्रमाणात शुद्ध राहते असे मानले जाते. नाणी, तार, मोटारगाड्यांचे भाग आणि छप्पर बनवण्यासाठीही तांब्याचा उपयोग केला जातो. तांबे इतर धातूंमध्ये मिसळून पितळ आणि कांस्य यासारखे मिश्रधातू तयार केले जातात.

एकूणच तांबे हे माणसाच्या दैनंदिन जी–वनात खूप उपयोगी असलेले खनिज आहे. त्यामुळे त्याचा जपून आणि योग्य वापर करणे खूप महत्त्वाचे आहे.

## विंध्य पर्वतरांग



**ओळख पर्वतांची**

विंध्य पर्वतरांग ही भारतातील एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. ही भारतातील प्राचीन पर्वतरांगांपैकी एक मानली जाते. ही पर्वतरांग उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांना वेगळी करणारी नैसर्गिक सीमा आहे. विंध्य पर्वतरांग गुजरातपासून सुरू होऊन मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारपर्यंत पसरलेली आहे. तिची सरासरी उंची सुमारे तीनशे ते सहाशे मीटर आहे. ही पर्वतरांग हिमालयासारखी अजूनही वाढत नाही. त्यामुळे तिचे डोंगर गोलसर आणि कमी उंचीचे दिसतात. ही प्रामुख्याने कठीण खडकांनी बनलेली आहे. विंध्य पर्वतरांग म्हणजे सलग उंच डोंगर नाहीत, तर काही ठिकाणी उंचसखल जमीन आणि काही ठिकाणी सपाट माथ्याचे डोंगर यांचा समूह आहे. म्हणून काही भागांत ती पठारासारखी वाटते. विंध्य पर्वतरांगेच्या उत्तरेकडील नद्या गंगा खोऱ्याकडे वाहतात तर दक्षिणेकडील नद्या नर्मदा खोऱ्यात मिळतात. या पर्वतरांगेतून अनेक नद्या उगम पावतात. नर्मदा, सोन, तापी आणि केन या नद्यांचे उगम विंध्य परिसरात आहेत. नर्मदा नदी विंध्य आणि सातपुडा पर्वतरांगांमधून वाहते आणि पश्चिमेकडे जाऊन अरबी समुद्राला मिळते. त्यामुळे या पर्वतरांगेचा जलसंपत्तीच्या दृष्टीने मोठा उपयोग होतो.

विंध्य पर्वतरांग परिसरात विविध प्रकारची वनसंपदा आढळते. साग, साल, बांबू यांसारखी झाडे येथे मोठ्या प्रमाणावर दिसतात. या जंगलांमध्ये वाघ, चित्ता, अस्वल, हरिण, माकड यांसारखे अनेक प्राणी राहतात. त्यामुळे हा भाग जैवविविधतेसाठी महत्त्वाचा आहे. इतिहासाच्या दृष्टीनेही विंध्य पर्वतरांग महत्त्वाची आहे. प्राचीन काळात उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांमधील प्रवास या पर्वतरांगांमुळे कठीण होता. त्यामुळे संस्कृती, भाषा आणि जीवनशैली यांत फरक निर्माण झाला. अनेक राजवटींच्या सीमा विंध्य पर्वतरांगेजवळ होत्या. रामायण आणि महाभारतातही विंध्य पर्वतरांगेचा उल्लेख आढळतो.

आजही विंध्य पर्वतरांग परिसरात शेती, खाणकाम आणि वनव्यवसाय चालतो. चुनखडी, कोळसा आणि इतर खनिजे येथे सापडतात. एकूणच विंध्य पर्वतरांग ही भारताच्या भूगोल, इतिहास आणि निसर्गसंपत्तीच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे.

## बनवा ध्रुवीय अस्वल

**करून तर पाहा**



आपल्याला थोडी थंडीसुद्धा सहन होत नाही. मग बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या प्राण्यांचं काय? अंटार्टिका खंडात खूप बर्फ असतो. पेंग्विन, पोलर बेअर (ध्रुवीय अस्वल) यांसारखे प्राणी तिथे राहतात. थंडीपासून बचाव करण्यासाठी निसर्गानेच त्यांच्या शरीराची रचना विशिष्ट पद्धतीने केलेली असते. पेंग्विन, ध्रुवीय अस्वलासारखे प्राणी आपण टिव्हीवरच बघू शकतो. पण असे प्राणी तुम्ही तयार करू शकता. ध्रुवीय अस्वलाची कलाकृती साकारूया...

**साहित्य** : कार्डपेपर, कापसाचे बोळे, गम, गुगली आईज, पॉम पॉम, मार्कर

**कृती** : कार्डपेपरवर मध्यम आकाराचं वर्तुळ काढा. आता या वर्तुळाच्या वरच्या बाजूला कानांच्या जागी दोन छोटी वर्तुळं काढायची आहेत. कप किंवा छोट्या वाटीच्या मदतीने तुम्ही ही वर्तुळं काढू शकता. हे आकार कापून घ्या. आता गोल आकाराच्या कार्डपेपरवर गम लावा. गम सगळीकडे नीट पसरवून घ्या. आता तुमच्याकडचे कापसाचे बोळे घ्या. हे बोळे वर्तुळावर चिकटवायचे आहेत. गम नीट वाळू द्या. डोळ्यांच्या जागी गुगली आईज चिकटवा. नाकाच्या जागी पॉप पॉम चिकटवा. झालं तुमचं पोलर बेअर तयार.

## बना अनुवादक



**कोण होणार?**

जग जवळ येत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसंच इतर कारणांमुळे लोक परदेश प्रवास करतात. आज इंग्रजीचा वापर होत असला तरी जगभरात असे अनेक देश आहेत जिथे मातृभाषेला प्राधान्य दिलं जातं. अशा देशांमधले लोक भारत किंवा इतर देशात जातात तेव्हा संवाद साधण्याचा अडसर निर्माण होतो. अनुवादक हा अडसर दूर करतो. विविध भाषा शिकून तुम्हीही या क्षेत्रात करीअर करू शकता. उत्तम अनुवादक बनण्यासाठी तुम्हाला भाषेची उत्तम जाण असायला हवी. भाषेसोबतच त्या देशातल्या संस्कृतीची माहिती असणं गरजेचं आहे. इंग्रजीसह विविध भाषांमधल्या पुस्तकांचा अनुवाद तुम्ही करू शकता. अनुवादक म्हणून पर्यटनाच्या क्षेत्रातही खूप संधी आहेत. विविध देशांमधून भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्याचं काम दुभाषा किंवा अनुवादक करू शकतो. पुस्तकांचा अनुवाद करायचा असेल तर भाषांवर पकड असणं गरजेचं आहे. मूळ लेखनाचा लहेजा कायम ठेवणं आवश्यक असतं.

अनुवादक म्हणून काम करताना भाषा बोलता, लिहिता आणि वाचता येण्यासोबतच धैर्य आणि स्थैर्यही गरजेचं आहे. हिंदी, इंग्रजीशिवाय इतर भाषांमधलं साहित्य तुम्ही मातृभाषेत आणू शकता. भारतात अनेकविध भाषा बोलल्या जातात. प्रत्येक राज्यात साहित्याची परंपरा आहे. हे साहित्य आपल्या मातृभाषेत आणण्याचं काम यानिमित्ताने करता येईल. परकीय भाषांमधल्या साहित्याचा अनुवादही तुम्ही करू शकता.

मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ यांसह अनेक खाजगी संस्थांमध्ये विविध भाषा शिकवल्या जातात.

## डोळे जपा

**आय केअर**

तुमच्या बऱ्याच मित्रमैत्रिणींना चष्मा लागला असेल. लहान वयात चष्मा लागण्याचं प्रमाण आजकाल खूप वाढलं आहे. तुम्ही मुलं स्मार्टफोन वापरता. लॅपटॉप, कॉम्प्युटरला डोळे लाऊन बसलेले असता. या सगळ्याचा डोळ्यांवर खूप ताण येतो. त्यामुळे डोळ्यांची काळजी घेणं सर्वात जास्त गरजेचं आहे. पोषक आहार घेऊन डोळ्यांचं आरोग्य राखता येतं. मग तुम्हीही न कंटाळता पोषक आहार घ्यायला सुरूवात करा. डोळ्यांच्या आरोग्यासाठी काय चांगलं? पाहुया...

✻ पालक, मेथीसारख्या पालेभाज्या खा. या पालेभाज्यांकडे बघून नाक मुरडू नका. पालकात बीटा केरोटिन, क जीवनसत्त्व तसंच इतर पोषक घटक असतात. या घटकांमुळे सूर्याच्या घातक किरणांपासून डोळ्यांचं रक्षण होतं.

✻ काजू, बदाम, जर्दाळूसारखा सुका मेवा आणि सूर्यफुलाच्या बियांमधून शरीराला ई जीवनसत्त्व मिळतं. हे ई जीवनसत्त डोळ्यांसाठी खूप गरजेचं असतं. ई जीवनसत्त्वामुळे डोळ्यांच्या अनेक समस्या दूर होतात. डोळ्यांचं आरोग्य उत्तम राहतं.

✻ आंबट फळांमध्ये क जीवनसत्त्व असतं. क जीवनसत्त्वामुळे डोळ्यांचे टिश्यू बळकट होतात. त्यामुळे संत्र, मोसंब, लिंबू यांसारखी फळं खा.

✻ डोळ्यांचं आरोग्य राखण्यासाठी गाजर खाण्याचा सल्ला दिला जातो. यात बीटा केरोटिन असतं. यामुळे डोळ्यांचं रक्षण होतं.

✻ लाल, पिवळ्या, हिरव्या भोपळी मिरच्या म्हणजे पोषक घटकांचा खजिना आहे. त्यामुळे त्या बाजूला काढून टाकू नका. यातल्या पोषक घटकांमुळे डोळे चांगले राहतात. दृष्टी सुधारते.



## फरक प्रिंटर्समधला

**स्मार्ट नॉलेज**



प्रिंटिंगच्या गरजा लक्षात घेऊन घरच्या घरी झटपट प्रिंट काढण्यासाठी वेगवेगळे प्रिंटर बाजारात उपलब्ध आहेत. हे प्रिंटर कॉम्प्युटर लॅपटॉपला किंवा मोबाईलला कनेक्ट करून सहज प्रिंट्स काढता येतात. प्रिंटरमध्ये लेझर आणि इंकजेट असे दोन प्रकार पहायला मिळतात. लेझर आणि इंकजेट या दोन्ही प्रकारांची स्वतःची वैशिष्ट्य आहेत. याबाबत माहिती घेऊया...

रंगीत प्रिंटससाठी इंक्जेट प्रिंटर उपयुक्त ठरतात. या प्रिंटच्या मदतीने रंगीत प्रिंटस घेता येतात. तसंच फोटोच्या प्रिंट्सही तुम्ही घेऊ शकता.तर लेझर प्रिंटरच्या मदतीने कागदपत्रांच्या प्रिंट्स घेतल्या जातात. लेझर प्रिंटरमधून काढलेल्या प्रिंटमधली अक्षरं अगदी स्पष्ट दिसतात. तर इंकजेट प्रिंटरमध्ये ती थोडी धुरकट दिसतात.

या दोन्ही प्रिंटरची काम करण्याची पद्धत पूर्णपणे वेगळी आहे. या दोहोंमध्ये वेगळ्या कार्टेजचा वापर केला जातो. लेझर प्रिंटरमध्ये टोनर कार्टेजचा वापर केला जातो. तर इंकजेटमध्ये इंक कार्टेजचा वापर केला जातो. इंकजेट प्रिंटरचा वापर तुलनेने बराच सोपा आहे. तर लेझर प्रिंटरचं तंत्रज्ञान थोडं अवघड आहे. लेझर प्रिंटरचा वापर करण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागतात. इंक्जेट प्रिंटर छोट्या जागेत अगदी सहज मावतो. तर लेझर प्रिंटरला जास्त जागा लागते. लेझर प्रिंटरचं काम झटपट चालतं. तर इंकजेट प्रिंटरला थोडा वेळ लागतो. तसंच इंकजेट प्रिंटरमध्ये सतत कागद बदलत बसावा लागतो.

इंकजेट प्रिंटरच्या तुलनेत लेझर प्रिंटर जास्त चांगल्या प्रकारे काम करतो.

## रो-रो फेरी म्हणजे नक्की काय?

**माहित आहे?**

रो-रो फेरी सेवा म्हणजे नेमकं काय, याविषयी जाणून घेऊया...

रो-रो म्हणजे रोल ऑन रोल ऑफ फेरी सेवा. गुजरातमधल्या घोघा आणि दहेज या बंदरांदरम्यान ही सेवा सुरू आहे. विशेष म्हणजे दक्षिण आशियातली ही अशाप्रकारची पहिलीच सुविधा आहे. अशी सेवा सुरू करण्याचा मान भारताला मिळाला ही बाब आपल्या प्रत्येकासाठी अभिमानास्पद म्हणावी लागेल. मध्ये समुद्र किंवा नदी असेल तर आपल्याकडचं वाहन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येत नाही. पण रो-रो सेवेच्या माध्यमातून वाहन बोटीवर चढवलं जातं आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेलं जातं.

गुजरातमधल्या या फेरी सेवेमुळे एका वेळी १०० पेक्षा जास्त वाहनं आणि जवळपास २५० प्रवासी बोटीतून प्रवास करू शकतील. मोठे ट्रक, गाड्या, बस अशी वाहनं फेरीमधून नेणं आता शक्य होणार आहे. घोगा हे बंदर भावनगर जिल्ह्यात आहे. तर दहेज भरूचमध्ये आहे. ही फेरी सेवा या दोन्ही जिल्ह्यांना जोडते. यापुढच्या टप्प्यात खंबातचं आखात आणि कच्छचं आखात या दरम्यानही ही सेवा सुरू करण्यात येणार आहे. शिवाय मुंबई आणि दक्षिणेतल्या इतर बंदरांनाही रो-रो फेरी सेवेच्या माध्यमातून जोडलं जाणार आहे. यामुळे वाहनांची ने-आण करणं सोपं जाणार आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ६१४ कोटी रूपयांचा खर्च आला. या सेवेमुळे घोघा आणि दहेज या दोन बंदरांमधल्या प्रवासाचा वेळ वाचतो. या दोन बंदरांमुळे दक्षिण गुजरात आणि सौराष्ट्र एकमेकांना जोडले जातात. या प्रवासासाठी आठ तास लागत असत. पण फेरी सेवेमुळे हा वेळ अवघ्या एक तासावर आला आहे. या सेवेमुळे इंधन आणि वेळ या दोन्हीची बचत होते.




## फ्लू झाला तर...

**हेल्थ वेल्थ**

सर्दी,खोकला, ताप असेल तर शाळेत न गेलेलं चांगलं. हा फ्लूसुद्धा असू शकतो. फ्लू म्हणजे एन्फ्लूएंझा. हा साथीचा आजार आहे. या रोगाचे जंतू हवेच्या माध्यमातून सगळीकडे पसरतात. शिंकल्यावर तसंच खोकल्यावर हे जंतू हवेत पसरतात आणि आसपासच्या लोकांनाही फ्लू होऊ शकतो. त्यामुळे फ्लू झाल्यावर शक्यतो घरात थांबायला हवं.

कफ, घसा खवखवणं, नाक गळणं, अंग दुखणं, डोकं दुखणं, दमल्यासारखं वाटणं ही फ्लूची लक्षणं असतात. फ्लूच्या जंतूमुळे जुलाब, उलट्यांसारख्या समस्याही निर्माण होतात. फ्लू झाल्यानंतर घरी राहिल्याने या रोगाचा फैलाव रोखता येतो. तसंच आराम केल्यामुळे हा रोग लवकर बरा होतो.

सर्दी, खोकला, डोकेदुखीसारखी लक्षणं दिसत असतील तर डॉक्टरांकडे जाऊन औषधं घ्या. लक्षणं फ्लूची असली तरी तुम्हाला फ्लू असेलच असं नाही. त्यामुळे डॉक्टरांकडून तपासणी करून घेणं गरजेचं आहे. गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका. घरी थांबा. तुमच्या खोलीत आराम करा. शिंकताना, खोकताना तोंडावर हात ठेवा. आराम करा.



भरपूर पाणी प्या. पूर्ण बरं घराबाहेर जाऊ नका. औषधं वेळेवर घ्या.

